POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-३१३ ● मुंबई, सोमवार, १५ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना



लाडक्या बहिणींना दणका! लवकरच वसुली

राज्यातील 'या' जिल्ह्यातील 33 हजार लाडक्या बहिणी कायमच्या अपात्र

राज्यातील लाडक्या बहिणींना मोठा दणका मिळाला आहे. या जिल्ह्यातील तब्बल 33 हजार लाडक्या बहिणी कायमच्या अपात्र ठरल्या आहेत. इतकं नव्हे तर नियमबाह्य लाभ घेणाऱ्यांकडून लवकरच वसुली होणार आहे.

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक,

ह्यमुख्यमंत्री माझी लाडकी बहीणह्ण योजनेबाबत अमरावती जिल्ह्यातून एक अत्यंत मोठी बातमी समोर येत आहे. या जिल्ह्यातील तब्बल 33 हजार 304 महिला लाभार्थी या योजनेसाठी कायमच्या अपात्र ठरल्या आहेत. प्रशासनाने तब्बल 8 ते 10 महिने राबवलेल्या ई-केवायसी मोहिमेनंतर ही धक्कादायक माहिती उघड झाली आहे. यामध्ये अनेक गैरप्रकार चव्हाट्यावर आले असून, चक्क काही पुरुषांनीही महिलांचं नाव दाखवून या योजनेचा नियमबाह्य लाभ घेतला आहे.

याशिवाय चुकीची ई-केवायसी, उत्पन्नाचे खोटे दाखले, आयकर भरणं आणि चारचाकी वाहन असणं अशा विविध कारणांमुळे या महिला अपात्र ठरल्या आहेत. विशेष म्हणजे, या अपात्र लाभार्थ्यांनी तब्बल 15 ते 20 महिने शासनाची दिशाभूल करून पैसे लाटले आहेत. आता अशा सर्व बोगस आणि नियमबाह्य लाभ घेणाऱ्यांकडून शासन पूर्ण रक्कम वसूल करणार आहे, त्यामुळे नियमबाह्य लाभ घेणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

अनेकांकडून योजनेचा गैरफायदा

निवडणुकीच्या तोंडावर दोन वर्षांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ह्यमुख्यमंत्री माझी लाडकी बहीणह्ण योजना जाहीर केली होती. तेव्हा या योजनेअंतर्गत सरसकट महिलांचे अर्ज स्वीकारण्यात आले होते. त्यानंतर लगेचच अर्ज मंजूर करून दर महिना 1500 रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत होते. मात्र या योजनेचा गैरफायदा असंख्य महिलांकडून होत असल्याचं निदर्शनास येताच सरकारने ई-केवायसी आणि अर्जांची पडताळणी सुरू केली. आतापर्यंत या योजनेतील लाखो लाभार्थी महिलांना अपात्र म्हणून वगळण्यात आलं आहे. त्यापैकी अमरावती जिल्ह्यातील 33 हजार महिला कायमच्या अपात्र ठरल्या आहेत.

योजनेतून 80 लाख अपात्र लाभार्थी वगळले

बँक खातं असलेल्या प्रत्येक ग्राहकाला दरवर्षी 'केवायसी' करावं लागतं. निकषात न बसणाऱ्या काही महिलांनी घाबरूनच ई-केवायसी केलं नाही. सरकारने प्राप्तिकर भरणाऱ्या, वयाचं, उत्पन्नाचं निकष पूर्ण न करणाऱ्या लाडक्या बहिणींना या योजनेतून टप्प्याटप्प्याने वगळलं. राज्यात या योजनेतून तब्बल 80 लाख अपात्र लाभार्थ्यांना वगळण्यात आलं आहे. नावावर वाहन असलेल्या महिलांची माहिती प्रादेशिक परिवहन विभागाकडून मागविण्यात आली. तसंच अन्य सरकारी योजनांचा लाभ घेणाऱ्या बहिणींना या योजनेतून बाद करण्यात आलं. धक्कादायक म्हणजे महिलांसाठीच्या या योजनेचा लाभ असंख्य पुरुषांनी घेतला. महिलांच्या खोट्या नावाने पुरुषांनी सादर केलेल अर्ज मंजूर कसे झाले, असाही प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला.

आता लाडक्या बहिणींना एकही रुपया मिळणार नाही, सरकारचा सर्वात मोठा निर्णय, कारणह्व

नागपूर जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या १ लाखांहून अधिक महिला ई-केवायसी न केल्याने आणि चुकीची माहिती दिल्याने अपात्र ठरल्या आहेत. शासनाने आता मुदतवाढ देण्यास नकार दिला आहे.

राज्य शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि लोकप्रिय असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांसाठी एक अत्यंत धक्कादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे. नागपूर जिल्ह्यातील तब्बल १ लाखांपेक्षा अधिक लाडक्या बहिणी या योजनेसाठी कायमच्या अपात्र ठरण्याची भीती निर्माण झाली आहे. शासनाने ई-केवायसी करण्यासाठी दिलेली मुदत आता संपली आहे. यात कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अपात्र ठरलेल्या महिलांसाठी योजनेचे दरवाजे कायमचे बंद झाले आहेत.

८ ते १० महिन्यांची मोहीम संपली, मुदतवाढ नाही

शासनाकडून पात्र लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण करण्यासाठी गेल्या ८ ते १० महिन्यांपासून संपूर्ण राज्यात ई-केवायसी मोहीम राबवली जात होती. या महिलांना त्यांचे बँक खाते आणि आधार कार्ड लिंक करण्यासाठी वारंवार आवाहन करण्यात आले होते. मात्र, नागपूर जिल्ह्यातील अनेक महिलांनी या मुदतीत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही. आता विभागाने याबद्दल स्पष्टीकरण दिले आहे. या मोहिमेला पुन्हा मुदतवाढ मिळणार नाही. अधिकृत आकडेवारी अद्याप जाहीर झाली नसली, तरी अपात्र ठरलेल्या महिलांचा आकडा १ लाखाच्या पार गेलेला नाही, अशी खात्रीलायक माहिती सूत्रांनी दिली आहे.

ह्यलबाडीह्ण उघड; आयटी आणि आरटीओ डेटाबेसचा वापर

या पडताळणी दरम्यान एक मोठी माहिती समोर आली आहे. अनेक महिलांनी या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी उत्पन्नाचे खोटे दाखले सादर करून आपले अर्ज मंजूर करून घेतले होते. शासनाने या लबाडीला चाप लावण्यासाठी थेट आयकर विभाग आणि आरटीओच्या डेटाबेसची मदत घेतली. ज्या महिलांच्या कुटुंबातील सदस्य आयकर भरतात किंवा ज्यांच्या नावावर चारचाकी वाहन नोंदणीकृत आहे, अशा अपात्र महिलांची माहिती या पडताळणीत समोर आली आहे. नियमांचे उल्लंघन करून लाभ घेणाऱ्या अशा सर्व महिलांना योजनेतून बाद करण्यात आले आहे.

वंचित राहिलेल्यांची होणार फेर तपासणी

एकीकडे खोटे अर्ज सादर करणाऱ्यांवर कारवाई होत असताना, दुसरीकडे ज्या खऱ्या अर्थाने गरजू आणि पात्र महिला आहेत, परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे ज्यांना अद्याप एकही हप्ता मिळालेला नाही, अशा महिलांसाठी शासनाने आता पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. अशा वंचित महिलांच्या अर्जांची संपूर्ण फेर तपासणी केली जाणार आहे. जर त्या खरोखर पात्र असतील, तर त्यांना योजनेचा लाभ दिला जाईल, असे संकेत प्रशासनाने दिले आहेत. मात्र, ज्यांनी ई-केवायसीकडे दुर्लक्ष केले किंवा खोटे दस्तऐवज सादर केले, त्यांचे मार्ग आता पूर्णपणे बंद झाले आहेत.

14 लोकांनी भरलेला टेम्पो विहिरीत पडला

8 जणांनी पाण्यातच जीव सोडला, पंढरपुरमधील घटनेनं महाराष्ट्र हळहळला

■सोलापूर। प्रतिनिधी,

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातून धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. म्हसवड येथील सिद्धनाथाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांच्या पिकअप गाडीचा तांदूळवाडी गावाजवळ भीषण अपघात झाला. भाविकांनी भरलेली ही पिकअप थेट रस्त्याशेजारील विहिरीत पडली. या भीषण दुर्घटनेत 8 जणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला असून, 6 जणांना वाचवण्यात यश आले आहे. या घटनेचा अंगावर काटा आणणारा व्हिडिओही समोर आला असून, या दुर्घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावचे रहिवासी असलेले भाविक म्हसवड येथील सिद्धनाथाच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून आपल्या गावाकडे पिकअप वाहनाने परतत असताना, म्हसवड-पंढरपूर मार्गावरील माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी गावाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. गाडी थेट रस्त्या कडेला असलेल्या एका खोल विहिरीत जाऊन कोसळली. या पिकअपमध्ये लहान मुलांसह एकूण 14 प्रवासी स्वार होते.

स्थानिकांची धाव आणि मदतकार्य

गाडी विहिरीत पडल्याचा मोठा आवाज होताच, परिसरातील स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. विहिरीत पाणी असल्याने अनेकांचा जीव धोक्यात होता. स्थानिकांनी जीवाची पर्वा न करता तातडीने मदतकार्य सुरू केले आणि विहिरीतून 6 जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळवले. मात्र, दुर्दैवाने 8 जणांचा पाण्यात गुदमरून जागीच मृत्यू झाला होता.

प्रशासन आणि पोलिसांची यंत्रणा दाखल

घटनेची माहिती मिळताच पंढरपूर आणि माळशिरस पोलीस प्रशासन, प्रांताधिकारी तसेच जिल्हा प्रशासनाची टीम घटनास्थळी दाखल झाली. विहिरीतून मृतदेह आणि वाहन बाहेर काढण्यासाठी तात्काळ अग्निशामक दलाची यंत्रणा आणि क्रेन पाचारण करण्यात आली. क्रेनच्या साहाय्याने प्रथम पिकअप जीप विहिरीबाहेर काढण्यात आली, त्यानंतर बचाव पथकाने विहिरीत उतरून सर्व 8 मृतदेह बाहेर काढले.

रांजणी गावावर शोककळा

अपघातातील सर्व मृत आणि जखमी हे पंढरपूर तालुक्यातील एकाच गावचे (रांजणी) असल्याने गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एकाच वेळी गावातील 8 जणांचा अंत झाल्याने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलीस या अपघाताचा पुढील तपास करत असून, नेमका चालक कसा चुकला याचा शोध घेतला जात आहे.




राज्यावर चिंतेचे ढग मान्सून हणेपुढे सरकेना

मुंबईसह राज्यात 15 जूनपासून मॉन्सूनच्या पावसाला सुरूवात होईल, असा अंदाज आहे. मात्र, यादरम्यानच भारतीय हवामान विभागाने मोठा इशारा दिला. प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाला. एल निनोमुळे थेट मॉन्सूनच्या पावसावर परिणाम होऊ शकतो. विदर्भात आज उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी केला. जून महिन्याच्या 14 तारखेला थेट उष्णतेचा इशारा दिला जात आहे. राज्यातील पेरण्या रखडल्या आहेत. मॉन्सूनचा दूरपर्यंत काही पत्ता नाही. त्यामध्येच एल निनोचा प्रभाव मॉन्सूनवर दिसत आहे. जगातील अनेक हवामान संस्था गंभीर इशारा देत आहेत. उद्यापासून संपूर्ण राज्यात मुसळधार पाऊस मॉन्सूनचा बरसण्याची शक्यता आहे. मॉन्सून बंगालसह बिहारच्या काही भागात प्रगती करत आहे. ओडिसासह झारखंडच्या भागात मॉन्सूनने हजेरी लावली. मात्र, अरबी समुद्रात मॉन्सून काही पुढे सरकताना दिसत नाही. मॉन्सूनच्या पुढील वाटचालीकरिता वाट पाहवी लागणार आहे. मॉन्सूनच्या वाटचालीकरिता अडथळा येत आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा मोठा इशार देण्यात आला. अरबी समुद्रातील मॉन्सूनची वाटचाल बघता राज्याला मॉन्सूनच्या पावसासाठी अजून काही दिवस वाट पाहवी लागणार आहे. शिवाय यंदा राज्यात पाऊस सरासरीपेक्षा कमी पडण्याचा अंदाज आहे. मॉन्सूनचा पाऊस पुढे वाटचाल करत नसल्याने मोठे संकट उभे आहे. राज्यात पेरण्या रखडल्या असून शेतकरी राजा चिंतेत आहे. जुनचा दुसरा आठवडा संपत आला आहे. पण अजूनही आभाळाने दार उघडलेलं नाही. पावसाचा एकही थेंब जमिनीवर पडलेला नाही. इकडे शेतकऱ्याने मात्र आशेच्या भरवशावर शेत तयार करून ठेवले आहेत. मशागत पूर्ण केली, खत-बियाणे घरात आणून ठेवले, पण आभाळाकडे पाहणारे त्याचे डोळे अजूनही प्रतीक्षेतच आहे. कारण बळीराजासाठी पाऊस म्हणजे केवळ पाणी नाहीह्व तर त्याच्या संसाराचा श्वास आहे. याच पावसावर लेकरांच्या शिक्षणाची स्वप्नं अवलंबून आहेत. मुला-मुलींच्या लग्नाची जबाबदारी अवलंबून आहे. घरखर्च, दवाखाना आणि वर्षभराच्या उदरनिर्वाहाची आशा अवलंबून आहे. त्यामध्येच कृषी विभागाने जोपर्यंत आवाहन केले जाणार नाही, तोपर्यंत पेरण्या करू नये, असे आवाहन केले आहे. ज्यामुळे दुबार पेरणीचे संकट राहणार नाही.

पावसाळ्यापूर्वी धोक्याचा इशारा

वसई-विरारमधील 134 जीर्ण इमारतींमध्ये नागरिकांचे वास्तव्य कायम



■वसई। प्रतिनिधी,

पावसाळा सुरू होण्याआधीच वसई-विरार शहरातील धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला आहे. मनपाच्या सर्वेक्षणात 134 इमारती धोकादायक असल्याचे समोर आले असून अनेक ठिकाणी अजूनही नागरिक राहत आहेत. काही ठिकाणी व्यावसायिक आस्थापनाही सुरू असल्याने दुर्घटनेची भीती वाढली आहे.

वसई-विरार शहरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. शहरातील अनेक जुन्या इमारतींची अवस्था दिवसेंदिवस खालावत असून भिंतींना तडे जाणे, छत कमकुवत होणे, गॅलऱ्या आणि जिन्यांची पडझड होणे अशा समस्या वाढताना दिसत आहेत. अशा स्थितीत मनपाने केलेल्या सर्वेक्षणात तब्बल 134 इमारती धोकादायक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विशेष म्हणजे या सर्व इमारती रिकाम्या झालेल्या नाहीत. काही ठिकाणी आजही कुटुंबे वास्तव्यास असून काही ठिकाणी दुकाने आणि व्यावसायिक व्यवहार सुरू आहेत. त्यामुळे पावसाळ्यात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. मनपाच्या आकडेवारीनुसार ई प्रभागात सर्वाधिक 42 अतिधोकादायक इमारती आहेत. त्यानंतर एच प्रभागात 27, जी प्रभागात 26, बी आणि सी प्रभागात प्रत्येकी 22, आय प्रभागात 16, डी प्रभागात १३ तर एफ प्रभागात 3 इमारती धोकादायक स्थितीत आहेत.

मनपाने आतापर्यंत 80 इमारती निष्कासित केल्या असल्या तरी उर्वरित अनेक इमारतींबाबत प्रक्रिया सुरू आहे. काही इमारती तांत्रिक सल्लागार समितीकडे अभिप्रायासाठी आहेत, तर काही ठिकाणी अजूनही नागरिक राहत असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणीमध्ये मालकी हक्काचे वाद, न्यायालयीन प्रकरणे, भाडेकरू आणि मालकांमधील मतभेद मोठे अडथळे ठरत आहेत. परिणामी अनेक इमारती वर्षानुवर्षे धोकादायक अवस्थेतच उभ्या आहेत. तज्ज्ञांच्या मते जुन्या इमारतींचे वेळोवेळी स्ट्रक्चरल ऑडिट होणे आवश्यक आहे. मात्र शहरातील अनेक इमारतींची अशी तपासणीच झालेली नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे भविष्यातील धोका अधिक वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. याआधीही अशा निष्काळजीपणाचे गंभीर परिणाम शहराने पाहिले आहेत. विरार पूर्वेकडील विजय नगर परिसरातील रमाबाई अपार्टमेंट दुर्घटनेत 17 नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता. या घटनेनंतरही धोकादायक इमारतींचा प्रश्न पूर्णपणे मार्गी लागलेला नसल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, धोकादायक इमारत कोसळल्यास किंवा नागरिकांना घरे रिकामी करावी लागल्यास त्यांच्यासाठी पयार्यी निवास किंवा ट्रान्झिट कॅम्पची पुरेशी व्यवस्था उपलब्ध नसल्याने चिंतेत आणखी भर पडत आहे.

मुंढेंच्या कारवाईची धास्ती, ज्यूस, आईस्क्रीमच्या दुकानांचं शटर डाऊन

भेसळयुक्त अन्नपदार्थांवर कारवाईची मोहीम

■जालना। प्रतिनिधी,

राज्यातील प्रशासनात सध्या चचेर्चा मुद्दा असलेले आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सूत्रे हाती घेतल्यानं राज्यात अन्नातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून सुरू करण्यात आलेल्या कठोर कारवाईचा परिणाम आता जालना शहरासह ग्रामीण भागातही दिसून येऊ लागला आहे. परिसरातील अनेक ज्यूस सेंटर, आईस्क्रीम पार्लर, शीतपेय विक्री केंद्रे तसेच काही खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी गेल्या काही दिवसांपासून आपली दुकाने तात्पुरती बंद ठेवल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत असून बाजारपेठेत विविध चर्चांना उधाण आलं आहे.

व्यापाऱ्यांमध्येही धास्तीचे वातावरण

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभर भेसळयुक्त अन्नपदार्थांवर कारवाईची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी पाठविणे, विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर राजूर परिसरातील व्यापाऱ्यांमध्येही धास्तीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

उन्हाळ्याच्या हंगामात ज्यूस, आईस्क्रीम आणि थंड पेयांची मोठ्या प्रमाणात विक्री होत असते. या काळात ग्राहकांची संख्या वाढलेली असते. मात्र, गेल्या आठवड्याभरापासून अनेक दुकाने बंद असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. काही व्यापाऱ्यांनी संभाव्य तपासणीच्या भीतीने आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी तात्पुरती दुकाने बंद ठेवल्याची चर्चा बाजारपेठेत सुरू आहे.

कच्च्या मालाचा वापर

स्थानिक नागरिकांच्या मते, सार्वजनिक



आरोग्याच्या दृष्टीने अन्नातील भेसळ रोखणे अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा कमी दर्जाच्या कच्च्या मालाचा वापर, अस्वच्छ वातावरणात तयार होणारे खाद्यपदार्थ, कालबाह्य वस्तूंची विक्री किंवा निकृष्ट दर्जाच्या बफार्चा वापर यामुळे ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने सुरू केलेल्या कारवाईचे अनेकांनी स्वागत केले आहे.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाकडून सर्व खाद्य व्यवसायिकांना आवश्यक परवाने घेणे, स्वच्छतेचे नियम पाळणे, दर्जेदार कच्चा माल वापरणे आणि अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या (एफएसएसएआय) नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे वारंवार सांगितले जात आहे. नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांना कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नसल्याचेही प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात येत आहे.

नियमांचे काटेकोर पालन करणे गरजेचे

काही व्यापाऱ्यांनी मात्र प्रशासनाच्या वाढत्या कारवाईमुळे व्यवसायिकांमध्ये चिंता निर्माण झाल्याचे सांगितलं. तपासणीदरम्यान कोणतीही त्रुटी आढळू नये यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि परवान्यांची पूर्तता केली जात असल्याचं त्यांनी नमूद केलं. जिल्ह्यात ज्यूस, आईस्क्रीम आणि शीतपेय विक्री केंद्रे तात्पुरती बंद राहण्यामागे तुकाराम मुंढेंच्या संभाव्य तपासणीची भीती हे प्रमुख कारण असल्याची चर्चा रंगत आहे.

शेगावात मध्यरात्री ७० लाखांच्या प्रतिबंधित पानमसाल्यासह ट्रक जप्त

■सोलापूर। प्रतिनिधी,

पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या शेगाव शहरात अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे मोठी कारवाई केली. पोलीसांनी यात तब्बल 70 लाख 13 हजार 920 रुपयांचा प्रतिबंधित पानमसाला, तंबाखू आणि मालवाहू ट्रक जप्त केला. ही कारवाई शेगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मध्यरात्री करण्यात आली.

माहितीनुसार, 13 जून रोजी रात्री 10.10 वाजताच्या सुमारास अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग किंता वसावे हे पोलीस कर्मचाऱ्यांसह अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग करत होते. यावेळी वरवट बकाल रोडवरील यादव बेकरीसमोर संशयास्पदरीत्या उभा असलेला अशोक लेलँड ट्रक (एमएच-40-जीटी-2965) अडवून त्याची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला. शासकीय आदेशांचे उल्लंघन करून हा माल विक्री आणि वाहतुकीसाठी नेला जात असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले.

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल



- बाजीराव गोल्ड पानमसाला – 50 पोते
- मस्तानी तंबाखू – 11 पोते
- नजर 1000 पानमसाला – 50 पोते
- एन-05 प्रीमियम तंबाखू – 50 पोते
- प्रीमियम नजर पानमसाला
- अशोक लेलँड मालवाहू ट्रक
- एकूण जप्त मुद्देमालाची किंमत – 70,13,920 रुपये

ट्रक चालक अटकेत

या प्रकरणात पोलिसांनी सुरूर अहमद नूर अहमद (वय 37, रा. फिरदोस कॉलनी, अकोला) या ट्रक चालकाला अटक केली आहे. तसेच M/S Shree Siddheshwar Tobacco Products Pvt. Ltd. (पांढुर्णा, छिंदवाडा, मध्य प्रदेश) येथील मालक, भागीदार आणि संचालकांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपींन विरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे शेगाव परिसरात अवैध पानमसाला आणि तंबाखू तस्करी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

जे पेराल, ते उगवेल!



पराकोटीच्या अहंकारी व्यक्तीला जागा दाखवण्याचे सामर्थ्य केवळ काळातच असते, हा इतिहास आहे. राजकारणात जे सत्तेच्या शिखरावर उन्मत्तपणे वागतात, त्यांना 'उद्या आपल्याला जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल', याची पुसटशीही कल्पना नसते. जेव्हा राज्यकर्ते सत्तेच्या माध्यमातून अन्याय आणि अत्याचार यांचा अतिरेक करतात, तेव्हा काळ स्वतः त्यांना लक्षात राहील, असा धडा शिकवत असतो. सध्या बंगाल राज्यात घडत असलेल्या घटना जणू याचीच साक्ष देत आहेत. सत्तेवरून पायउतार व्हावे लागलेल्या तृणमूल काँग्रेसच्या मोठ्या नेत्यांना सध्या रस्त्यावर ज्या प्रकारे जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे, ते पहाता जनतेच्या मनातील खदखद दिसून येते. गेल्या १५ वर्षांपासून तृणमूल काँग्रेसच्या ज्या नेत्यांनी सत्तेच्या बळावर आणि हिंसेच्या जोरावर हिंदूंचा अतोनात छळ केला, बांगलादेशी घुसखोरांना भारतात वसवले, विरोधकांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला, आज त्याच नेत्यांना जनआक्रोशाचा आणि अपमानाचा सामना करावा लागत आहे. बंगाली जनतेच्या मनात अन्यायाविरुद्धची जी चीड आहे, त्याची दाहकता राज्यातील विविध भागांत घडलेल्या ताज्या घटनांवरून स्पष्ट होते. कामारहाटी भागामध्ये तृणमूल काँग्रेसचे अत्यंत वजनदार नेते आणि ज्येष्ठ आमदार मदन मित्रा यांच्या वाहनावर संतप्त आंदोलकांनी अंडी फेकून अन् त्यांच्याविरुद्ध घोषणाबाजी करून रोष व्यक्त केला. या प्रकरणाची व्याप्ती केवळ रस्त्यावरील आंदोलनापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर कोलकाता येथील पटुली पोलीस ठाण्याच्या परिसरातच तृणमूलचे नेते दासगुप्ता यांनासुद्धा अशाच प्रकारे अंडी फेकून मारण्यात आली. भूमी हडपणे आणि लोकांना धमकावणे या प्रकरणी त्यांच्यावर संतप्त लोकांनी राग काढला. यासह दास यांच्या निकटवर्तीय पदाधिकाऱ्याकडे मोठ्या प्रमाणात आपत्कालीन साहाय्याची सामुग्री आढळून आल्याचाही राग लोकांनी त्यांच्यावर काढला. तृणमूलच्या सत्ताकाळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. शिक्षकभरती घोटाळ्यापासून विविध योजनांमधील अनियमितता, स्थानिक पातळीवरील आर्थिक गैरव्यवहार आणि सत्तेच्या जवळ असलेल्या व्यक्तींवर होणारे आरोप, यांमुळे तृणमूल काँग्रेसची प्रतिमा मोठ्या प्रमाणात खराब झाली. या भ्रष्टाचाराच्या विरोधातील धग अजूनही जनतेच्या मनात घर करून आहे. याचे उदाहरण म्हणजे श्यामपूर भागात 'मनरेगा' योजनेतील गैरव्यवहारावरून गावकर्‍यांनी तृणमूलचे नेते मन्ना यांना वेढा घालून खडसावले. खरेतर जनतेने ही रोखठोक भूमिका तेव्हाच घेतली असती, तर तृणमूल काँग्रेसचे गुंड प्रवृत्तीचे कार्यकर्ते एवढे उन्मत्त झाले नसते. या सर्व घटनांवरून जनतेच्या मनातील असंतोषाचा ज्वालामुखी कसा धगधगत आहे ?, हे लक्षात येते. अर्थात् कुठलीही हिंसा अजिबात समर्थनीय नाही. केवळ इतकेच सांगायचे आहे की, तृणमूलच्या नेत्यांना आज तेच भोगावे लागत आहे, जे त्यांनी पूर्वी केले आहे. लोकशाहीत अशा प्रकारचा विरोध होणे, हे नवीन नाही. कोणत्याही सरकारला किंवा पक्षाला टीकेचा सामना करावाच लागतो. तथापि जेव्हा विरोध केवळ राजकीय प्रतिस्पर्ध्याकडून न होता सामान्य नागरिकांच्या पातळीवरूनही उघडपणे केला जातो, तेव्हा ते अधिक गंभीर मानले जाते. बंगालमध्ये आज नेमके तेच घडतांना दिसत आहे. यावरून बंगालमधील जनतेच्या प्रतिक्रिया आता मतपेटीपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत, तर प्रत्यक्ष रस्त्यावर दिसू लागल्या आहेत. राजकारणात जनमानसातील भावना हा सर्वांत महत्त्वाचा घटक असतो. बंगालच्या राजकारणाला प्रथमपासूनच हिंसेचा इतिहास लाभलेला आहे. डाव्या (साम्यवादी) आघाडीच्या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ आणि जुलमी राजवटीत हिंसा हीच राज्य करण्याची कार्यपद्धत होती. 'हम करे सो कायदा' हे शब्दशः तेथे घडत होते. पुढे ममता बॅनर्जी यांनी साम्यवाद्यांच्या सत्तेला सुरुंग लावून स्वतःची सत्ता स्थापन केली. तेव्हा बंगालमधील सर्वसामान्य जनतेला मोठ्या परिवर्तनाची अपेक्षा होती; परंतु तृणमूलने साम्यवाद्यांच्या दोन पावले पुढे जाऊन जनतेत हिंसा आणि भय निर्माण करण्याची परंपरा कायम ठेवली. बंगालच्या मागील विधानसभेच्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसच्या गुंडांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरू न देण्यापासून त्यांच्या घरांची जाळपोळ करण्यापर्यंत करता येईल तितका हिंसाचार केला. पुढे तृणमूल काँग्रेसची सत्ता आल्यावर तर या हिंसाचाराने कहरच केला. विरोधी पक्षांच्या पराभूत उमेदवारांना गाठून त्यांना मारहाण करणे, अत्याचार करणे, त्यांच्या हत्या करणे आदी त्यांनी केले. सत्तेच्या अमर्याद अधिकारामुळे तृणमूलचे नेते अहंकारीच नव्हे, तर हिंसाचारी तृणमूल काँग्रेस कुणालाही जुमानत नसल्याचे पाहून काळाने चक्रे फिरवली. आज बंगालमध्ये सत्तांतरानंतर तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांचे हालहाल होतांना दिसत आहेत. ज्याप्रमाणे त्यांनी लोकांना त्रास दिला होता, तसाच त्रास आज ते भोगतांना दिसत आहेत. जे त्यांनी पेरले, तेच आज उगवले आहे. कौटिल्य अर्थशास्त्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, ज्या राज्यामध्ये प्रजा नेहमी भयभीत आणि त्रस्त असते, तेथील सत्ताधिशांचे पतन निश्चित असते. अनाचारी आणि दुराचारी तृणमूल काँग्रेसच्या पतनाचे मूळ यात आहे. बंगालला हिंसेच्या या दुष्टचक्रातून मुक्त करण्यासाठी आता सर्वच स्तरांवरून तातडीने, गांभीर्याने आणि कठोरतेने पावले उचलण्याची आवश्यकता आहे. बंगालमध्ये नव्याने सत्तेवर आलेल्या भाजप सरकारचे दायित्व यामध्ये मोठे आहे. सर्वप्रथम सर्व गुन्हेगारांना सरकारने कारागृहात डांबले पाहिजे. गुन्हे करणार्‍यांच्या घरांवर बुलडोझर कारवाई केली पाहिजे, घुसखोरांना बांगलादेशात हाकलले पाहिजे आणि धर्मांधांना वठणीवर आणले पाहिजे. सरकारने हे केले, तरच बंगालमध्ये कायद्याचे राज्य पुनर्स्थापित होऊ शकेल. राजकारणात मिळालेल्या पदाचा कधीही गर्व करू नये, असे म्हटले जाते. ज्या ममता बॅनर्जी एकेकाळी साम्यवाद्यांच्या अहंकारी सत्तेविरुद्ध उभ्या ठाकल्या, आज त्यांनाच जनतेच्या असंतोषाचा करावा लागणारा सामना, म्हणजे इतिहासाची पुनरावृत्ती आहे. या वास्तवातील 'द बंगाल फाईल्स'मधून सर्वच पक्षांच्या राजकारण्यांनी वेळीच योग्य धडा घेतला पाहिजे. सत्तेचा अहंकार, गुंडगिरी, दडपशाही आदींचा जेव्हा अतिरेक होतो आणि त्यात सर्वसामान्य माणूस सातत्याने भरडला जातो, तेव्हा काळ स्वतः न्यायनिवाडा करतो अन् जेव्हा काळ न्यायनिवाडा करतो, तेव्हा तो कुणाचीही गय करत नाही, हेच बंगालमध्ये दिसून येत आहे. सर्वच ठिकाणच्या राज्यकर्त्यांनी हे लक्षात घेऊन राज्यकारभार केला पाहिजे !

विद्यापीठांपेक्षा कारागृहे झाली उदंड



भारतात केंद्रीय कारागृहांची संख्या १३४, तर केंद्रीय विद्यापीठे ५६ आहेत, म्हणजे विद्यापीठांपेक्षा सेंट्रल जेलची संख्या अधिक आहे. देशातील शिक्षण व्यवस्थेला आपण किती कमी महत्त्व देतो त्याचा हा ढळढळीत पुरावा आहे. शिक्षणाची ही उपेक्षा घातक ठरणार आहे.

'शिक्षण फक्त माहिती देण्याची प्रक्रिया नाही; ते विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा, विचार आणि आनंद निर्माण करण्याची कला आहे.' हे सुभाषित खरे असले तरी वास्तव परिस्थिती मात्र यापेक्षा कितीतरी वेगळी असते.

कारण वास्तव परिस्थिती धोरणकर्त्यांच्या धोरणांवर अवलंबून असते. धोरणकर्ते कोणत्या वर्गाच्या बाजूचे आहेत, यावरून धोरण (पॉलिसी) ठरत असतात. बहुतांशी अर्थसत्ता ज्यांच्या ताब्यात असते त्यांचा धोरणांवर अधिक प्रभाव असतो. अशावेळी धोरणकर्ते धोरण ठरवताना शिक्षणाकडे कोणत्या हेतूने पाहतात हे महत्त्वाचे असते. जर शिक्षण व्यवस्थेकडे मनुष्यबळाचा विकास आणि समाज निर्मितीची भविष्यकालीन गुंतवणूक म्हणून पाहिले तर समाज सुदृढ होईल, पण शिक्षण व्यवस्थेकडे नफा कमविण्याचे साधन म्हणून पाहिले तर शिक्षणातील मूल्य व्यवस्था नष्ट होईल आणि निरोगी समाज निर्मितीचे स्वप्न पूर्णत्वास येणार नाही. समाजातून शिक्षणाचे महत्त्व कमी झाले की गुन्हेगारी वाढते आणि कारागृहांची संख्या वाढवावी लागते. कोरोनाच्या कालखंडानंतर शाळांतून विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आणि कारागृहातील गुन्हेगारांची संख्या वाढली, हे वास्तव ध्यानात ठेवले पाहिजे. २०१४-१५ च्या तुलनेत २०२४-२५ मध्ये तब्बल एक लाख शाळा बंद झाल्या आहेत, याउलट गुन्हेगारीचा आलेख सतत उंचावत आहे.

भारतात २०२४ अखेरपर्यंत सुमारे एक हजार ३३३ कारागृहे होते. यामध्ये केंद्रीय कारागृहे, जिल्हा कारागृहे, उपकारागृहे, महिला कारागृहे, खुली कारागृहे आणि विशेष कारागृहे यांचा समावेश होतो.

२०२३ च्या आकडेवारीनुसार भारतात एक हजार ३३२ कारागृहे होती, तर २०२४ मध्ये त्यांची संख्या वाढून एक हजार ३३३ झाली. कोरोनाच्या कालखंडानंतर कैद्यांमध्ये सुद्धा वाढ झाली आहे. याउलट कोरोनाच्या कालखंडानंतर विद्यार्थ्यांच्या वर्गातील उपस्थितीवर विपरीत परिणाम झाला. जागतिक पातळीवर शिक्षणाची अतिशय दयनीय अवस्था असणाऱ्या युगांडा, हैती यांसारख्या आफ्रिकन देशांमध्ये कारागृहात सर्वाधिक लोकांना डांबून ठेवण्यात आले आहे. तेथील क्राइम रेट जगात सर्वाधिक आहे, कारण तिथे शिक्षणाची परिस्थिती अत्यंत बिकट आहे.

सध्या भारतात केंद्रीय कारागृहाची संख्या १३४, तर केंद्रीय विद्यापीठे ५६ आहेत, म्हणजे विद्यापीठांपेक्षा सेंट्रल जेलची संख्या अधिक आहे. भारतात सध्या एकूण एक हजार ३३८ विद्यापीठे आहेत. यामध्ये केंद्रीय, राज्य, खासगी आणि डीम्ड विद्यापीठांचा समावेश होतो. शासकीय किंवा अनुदानित राज्य विद्यापीठांची संख्या कमी होऊन खासगी विद्यापीठांची संख्या वाढते आहे.

२०१३-१४ ते २०२६-२७ दरम्यान सरकारने शालेय शिक्षण बजेटमध्ये ४८ टक्के कपात केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये 'शिक्षकांची पुरेशी संख्या सुनिश्चित करण्या'बाबत आश्वासन देणारे सरकार प्रत्यक्षात त्याच्या उलट काम करताना दिसत आहे. भारतात एकूण १४ लाख ७१ हजार शाळा आहेत. त्यापैकी १.०४ लाख शाळांमध्ये फक्त एकच शिक्षक आहे. या शाळांमध्ये ३३ लाख ८ हजार विद्यार्थी शिकत आहेत, असा नीती आयोगाचा अहवाल असून याचा फटका मुख्यत्वे ग्रामीण भागातील गरीब, मागासवर्गीय आणि मुलींना बसतो.

देशात २०१४-१५ ते २०२४-२५ या दशकभरात लाखभर शाळा बंद झाल्या असून, त्यात ९४ हजार सरकारी आणि चार हजार सरकारी अनुदानित शाळांचा समावेश आहे. त्याचवेळी ५१ हजार खासगी शाळा वाढल्या आहेत. मात्र, विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशाचे प्रमाण कमी झाले आहे. केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या शालेय शिक्षणावरील अहवालातून ही आकडेवारी उघड झाली आहे. आयोगाने 'स्कूल एज्युकेशन सिस्टीम इन इंडिया : टेम्पोरल ॲनलिसिस अँड पॉलिसी रोडमॅप फॉर क्वालिटी एन्हान्समेंट' हा अहवाल नुकताच जाहीर केला.

यात २०१४-१५ ते २०२४-२५ या दशकभराच्या कालावधीतील देशातील शाळांची संख्या, विद्यार्थी प्रवेश, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर, विद्यार्थ्यांचे शाळांत टिकण्याचे प्रमाण, शाळांतील सुविधा, विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती अशा विविध घटकांचा अभ्यास करण्यात आला. या अहवालानुसार, दशकभरात विद्यार्थ्यांच्या शाळाप्रवेशाचे प्रमाण आठ टक्क्यांनी घटले. २०१४-१५ मध्ये २६.९५ कोटी विद्यार्थी शाळा प्रवेशित होते, तर २०२४-२५ मध्ये २४.६९ कोटी विद्यार्थी शाळेत प्रवेशित झाले. शाळा प्रवेशाचे प्रमाण घटण्यामागे कमी झालेला शालेय वयोगटातील विद्यार्थ्यांच्या लोकसंख्येतील घट, सरकारी शाळांचे विलीनीकरण, काही शाळा बंद करणे अशी कारणे देण्यात आली आहेत. 'शिक्षकांची उपलब्धता आणि त्यांच्या नियुक्तीचा शिक्षणाच्या दर्जावर लक्षणीय परिणाम होतो. शिक्षकांची कमतरता आणि नोकरी सोडण्याचे प्रमाण याचा सर्वाधिक फटका कमी उत्पन्न असलेल्या आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना बसतो. पर्यायाने विद्यार्थ्यांच्या शाळेत टिकून राहण्याच्या प्रमाणावर, पुढील वर्गात जाण्याच्या प्रमाणावर विपरीत परिणाम होतो. शिक्षण क्षेत्रात प्रवेशक्षमता, समानता, गुणवत्ता, व्यवस्थेची लवचिकता या सुधारणा दीर्घकाळासाठी पुढे नेण्याच्या दृष्टीने सार्वजनिक गुंतवणुकीत शाश्वत आणि सुव्यवस्थित वाढ करणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल,' असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. अनेक शाळांमध्ये शिक्षक नाहीत. केवळ शाळाच नाही, तर महाविद्यालयांबाबतही हेच धोरण असल्याचे दिसते.

ज्या धर्तीवर कमी पटसंख्येच्या शाळांचे समूह शाळेत रूपांतर केले जात आहे, त्याच धर्तीवर आता उच्च शिक्षणातही मोठे बदल होणार आहेत. विद्यापीठांवरील शैक्षणिक व प्रशासकीय भार हलका करण्यासाठी ३ ते ५ महाविद्यालये एकत्र करून समूह विद्यापीठ स्थापन करण्याचा धोरणात्मक निर्णय सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे नवीन पदनिर्मिती थांबणार असून भविष्यात सरकारी नोकऱ्या आणि अनुदानाला कात्री लागण्याची शक्यता आहे. राज्य मंत्रिमंडळाने या धोरणाला मंजुरी दिली असून त्यानुसार, ३ ते ५ अनुदानित किंवा विनाअनुदानित महाविद्यालये एकत्र करून समूह विद्यापीठ तयार करण्यात येईल. यामध्ये किमान एक अनुदानित महाविद्यालय असणे अनिवार्य असेल. राज्यात सध्या ४ हजार ८९० महाविद्यालये आहेत. त्यातील १ हजार १७० महाविद्यालये अनुदानित आहेत. समूह विद्यापीठांच्या माध्यमातून शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च कमी करण्याचा शासनाचा मूळ हेतू असल्याचे सांगितले जात असले तरी पडद्यामागील हेतू वेगळाच दिसतो.

उच्च शिक्षण व्यवस्थेचे खासगीकरण करण्याचा हेतू यातून स्पष्ट दिसत असला तरी त्यातून ग्रामीण आणि वंचित घटकातील मुला-मुलींच्या शिक्षणाची अवस्था बिकट होणार नाही यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. भविष्यात गुन्हेगारी आणि कारागृहांऐवजी गुणवत्तापूर्ण शाळा आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे, एवढीच माफक अपेक्षा आहे.

२०१४-१५ मधील स्थिती

- एकूण शाळाः १५ लाख १६ हजार
- सरकारी शाळाः ११.०७ लाख (७३ टक्के)
- अनुदानित शाळाः ८३ हजार (५.५ टक्के)
- खासगी मान्यताप्राप्त शाळाः २.८८ लाख (१९ टक्के)
- मदरसा, तत्सम शाळाः ३८ हजार (२.५ टक्के)

२०२४-२५ची स्थिती

- एकूण शाळाः १४ लाख ७१ हजार
- सरकारी शाळाः १०.१३ लाख (६९.९ टक्के)
- अनुदानित शाळाः ७९ हजार (५.४ टक्के)
- खासगी मान्यताप्राप्त शाळाः ३.३९ लाख (२३ टक्के)
- मदरसा, तत्सम शाळाः ३९ हजार (२.७ टक्के)

१२ वर्षांच्या प्रचारकाळात हरवलेला भारत



मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचा मोठा उत्सव साजरा केला जात आहे. जाहिरातींमधून यशाची अनेक उदाहरणे दिली जात आहेत. परंतु इतिहास जाहिरातींनी लिहिला जात नाही. इतिहास कारखाने मोजतो, संस्था मोजतो, रोजगार मोजतो, लोकशाहीची ताकद मोजतो आणि सामान्य माणसाच्या जीवनातील बदल मोजतो.

नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची बारा वर्षे पूर्ण केली आहेत. सरकारी जाहिराती, विशेष मोहिमा, सोशल मीडियावरील प्रचार आणि भाजप व मित्रपक्षाच्या नेत्यांची भाषणे यामधून या बारा वर्षांच्या संख्यात्मक कारकीर्दीचे गौरवगान केले जात आहे. मोदी हे जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहिलेले नेते ठरले आहेत, हा या प्रचाराचा केंद्रबिंदू आहे. ते सत्य नाही. जवाहरलाल नेहरू हे या देशाचे सर्वाधिक काळ पंतप्रधान राहिलेले आहेत हे ऐतिहासिक सत्य आहे. भाजपच्या दाव्यावर विश्वास ठेवला तर मग सरदार वल्लभभाई पटेल देशाचे गृहमंत्री कोणत्या काळात होते? डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. शामाप्रसाद मुखर्जी कोणत्या काळात केंद्रीय मंत्री होते? काही क्षणापुरता भाजपच्या खोट्या प्रचारावर विश्वास ठेवला तरी इतिहास केवळ सत्तेचा कालावधी मोजत नाही; तो त्या सत्तेने राष्ट्राला काय दिले याचे मूल्यमापन करतो. लोकशाहीत एखादा नेता किती काळ सत्तेत राहिला यापेक्षा त्या काळात त्याने कोणती संस्थात्मक पायाभरणी केली, अर्थव्यवस्थेला कोणती दिशा दिली, समाजात कोणते परिवर्तन घडवून आणले आणि पुढील पिढ्यांसाठी कोणता वारसा निर्माण केला, याला अधिक महत्त्व असते. म्हणूनच नरेंद्र मोदी यांच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचे मूल्यमापन करताना प्रचाराच्या झगमगाटापेक्षा वास्तवाच्या आरशात पाहण्याची गरज आहे.

घोषणांचे राजकारण आणि वास्तवातील तफावत

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी सत्तेवर आले तेव्हा देशात मोठ्या अपेक्षांचे वातावरण होते. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, रोजगारनिर्मिती, आर्थिक विकास, शेतकरी, महिला सक्षमीकरण आणि जागतिक पातळीवर भारताचे नेतृत्व अशा अनेक आश्वासनांनी जनतेला आकर्षित केले. नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासून देशासमोर अनेक महत्त्वाकांक्षी आश्वासने ठेवली. प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये, दरवर्षी २ कोटी रोजगार, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, काळा पैसा परत आणणे, स्मार्ट सिटींची उभारणी, मेक इन इंडियाद्वारे उत्पादन क्षेत्रात क्रांती, गंगा शुद्धीकरण अशा अनेक घोषणांचा मोठा गाजावाजा केला. मात्र बारा वर्षांनंतर या आश्वासनांचे मूल्यमापन करताना यातील बहुतांश घोषणा हवेतच विरल्याचे चित्र आहे. मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्कील इंडिया, स्टार्टअप इंडिया, स्मार्ट सिटी, सांसद आदर्श ग्राम योजना, आत्मनिर्भर भारत अशा योजनांचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यात आला. प्रत्येक योजनेसोबत भारताच्या भविष्यातील भव्य चित्र रंगवण्यात आले. परंतु आजही वाढती बेरोजगारी, कृषी क्षेत्रातील संकटे, बकाल शहरे, वाढती आर्थिक विषमता आणि महागाई यांसारख्या प्रश्नांनी सामान्यांचे जगणे कठिण झाले आहे.

नोटाबंदी : आर्थिक धक्क्याचे राजकारण

८ नोव्हेंबर २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणातून नोटाबंदीची घोषणा केली. हा निर्णय स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वात मोठ्या आर्थिक निर्णयांपैकी एक मानला गेला. काळा पैसा संपुष्टात येईल, दहशतवादाला आर्थिक पुरवठा थांबेल आणि बनावट चलनाचे जाळे उद्ध्वस्त होईल, असे दावे करण्यात आले. देशभरातील कोट्यवधी नागरिक बँकांच्या रांगांमध्ये उभे राहिले, रांगेत अनेकांचा मृत्यू झाला. ग्रामीण अर्थव्यवस्था, लघुउद्योग, व्यापारी, शेतकरी आणि असंघटित क्षेत्रातील कामगार उद्ध्वस्त झाले. आज मागे वळून पाहिले तर नरेंद्र मोदींनी नोटाबंदीच्या सांगितलेल्या उद्दिष्टांमधील एकही पूर्ण झाले नाही. उलट लाखो लघु व मध्यम उद्योग बंद झाले, कोट्यवधी लोक बेरोजगार झाले आणि देशाच्या अर्थव्यवस्थेची मोठी हानी झाली.

रोजगाराचे आश्वासन आणि युवकांची निराशा

मोदी सरकारने दरवर्षी २ कोटी रोजगार निर्माण करण्याचे आश्वासन दिले होते. पण त्यांच्या सत्ताकाळात देश ४७ वर्षांतील बेरोजगारीचा उच्चांक अनुभवतो आहे. आज लाखो तरुण सरकारी भरतीची वाट पाहत आहेत. ठएएळ, उइरए सह विविध राज्यांमधील लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचे पेपर वारंवार फुटत आहेत, परीक्षा रद्द होत आहेत, मूल्यांकनाचा घोळ सुरू आहे. भारत हा तरुणांचा देश आहे, पण सरकारच्या गलथानपणामुळे तरुण हताश आणि निराश आहेत.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन

स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन मोदी सरकारने दिले होते. कृषी क्षेत्रात अनेक योजना जाहीर करण्यात आल्या. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढता उत्पादन खर्च आणि हमीभावाचा प्रश्न कायम आहे. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये शेतकरी अजूनही कर्जबाजारीपणामुळे मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहेत.

वाढती आर्थिक विषमता

भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था झाल्याचा दावा सरकार सातत्याने करत आहे. परंतु अर्थव्यवस्थेचा वाढीचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलाच नाही. काही मोजक्या उद्योगपतींची संपत्ती झपाट्याने वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला महागाई, बेरोजगारी आणि उत्पन्नातील असमानतेमुळे सामान्य नागरिक जीवन जगण्यासाठी संघर्ष करत आहेत. पेट्रोल, डिझेल, गॅस, अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींनी मध्यमवर्ग आणि गरीब पिचला जात आहे. दैनंदिन गरजा भागविण्यासाठी तो सातत्याने कर्ज काढत आहे. दुर्दैवाने देशात तसे चित्र सध्या तरी दिसत नाही.

नेहरूंनी उभारल्या संस्था, मोदींनी उभारली प्रतिमा?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १२ वर्षांच्या सत्ताकाळातील बहुतांश वेळ नेहरूंवर टीका करण्यात गेला. नेहरूंनी त्यांच्या सत्ताकाळात एम्स, आयआयटी, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, राष्ट्रीय संशोधन संस्था, मोठी धरणे, वैज्ञानिक संशोधनाची पायाभरणी केली. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आधुनिक शिक्षणव्यवस्थेचा विस्तार ही नेहरूंच्या दूरदृष्टीची उदाहरणे आहेत. त्यांनी राष्ट्रनिर्मितीचा पाया संस्थांवर उभारला. मोदी सरकारच्या काळात मोठ्या प्रमाणावर व्यक्तिकेंद्री राजकारणाचा प्रभाव वाढला. राष्ट्रनिर्मिती ही व्यक्तिपूजेवर नव्हे तर संस्थांच्या बळकटीकरणावर अवलंबून असते.

लोकशाही संस्थांवरील वाढते प्रश्न

भारतीय लोकशाहीची ताकद तिच्या स्वायत्त संस्थांमध्ये आहे. संसद, न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग, प्रसारमाध्यमे आणि विविध घटनात्मक संस्था या लोकशाहीच्या आधारस्तंभ आहेत. गेल्या काही वर्षांत या संस्थांच्या स्वायत्ततेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. केंद्रीय तपास यंत्रणांच्या गैरवापराची शेकडो नव्हे हजारो उदाहरणे समोर आली. लोकशाहीमध्ये सरकारला प्रश्न विचारणे हे देशविरोधी नसते. उलट सत्तेची जबाबदारी निश्चित करण्यासाठी ते आवश्यक असते. पण आजच्या वातावरणात टीकाकारांना देशद्रोही, खलिस्तानी म्हटले जाते.

नेहरू आणि मोदी : तुलना कोणत्या निकषावर?

नेहरूंनी विभाजनाच्या जखमा, दारिद्र्य, निरक्षरता आणि संस्थात्मक शून्यतेतून भारत उभा केला. त्यांनी विज्ञाननिष्ठ भारताचे स्वप्न पाहिले. लोकशाही संस्था मजबूत केल्या. अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणाद्वारे भारताला स्वतंत्र जागतिक ओळख मिळवून दिली. मोदी यांना स्थिर लोकशाही, मजबूत संस्था आणि वाढती अर्थव्यवस्था यांचा वारसा मिळाला होता. पण मोदींच्या कार्यकाळात हा मजबूत पायाही कमकुवत झाला.

इतिहास जाहिरातींनी लिहिला जात नाही

मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचा मोठा उत्सव साजरा केला जात आहे. जाहिरातींमधून यशाची अनेक उदाहरणे दिली जात आहेत. परंतु इतिहास जाहिरातींनी लिहिला जात नाही. इतिहास कारखाने मोजतो, संस्था मोजतो, रोजगार मोजतो, लोकशाहीची ताकद मोजतो आणि सामान्य माणसाच्या जीवनातील बदल मोजतो. त्या कसोटीवर प्रत्येक सत्ताधाऱ्याला उभे राहावे लागते.

विकासाची तपपूर्ती

भारताचे सर्वाधिक काळ पंतप्रधान पद भूषविणाऱ्या नेत्यांमध्ये नरेंद्र मोदी यांनी महत्त्वाचा टप्पा गाठला. २०१४ पासून सुरू झालेल्या त्यांच्या कार्यकाळात देशाच्या राजकारणात मोठे बदल झाले असून प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सामाजिक धोरणांमध्ये विविध सुधारणा आणि उपक्रम राबवले गेले. या काळात विकास, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक सेवांच्या विस्तारावर विशेष भर देण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचे सर्वाधिक काळ पंतप्रधान पद भूषविणारे नेते म्हणून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ४३९९ दिवस ते पंतप्रधानपदी आहेत, हा एक उल्लेखनीय विक्रम मानला जातो. २०१४ मध्ये भारताच्या राजकीय परिस्थितीत एक मोठा बदल झाला आणि देशाने विकासाच्या दिशेने नवे टप्पे गाठले. या काळात प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सामाजिक धोरणांमध्ये विविध बदल घडून आले. त्या काळात देशासमोर भ्रष्टाचार, प्रशासनातील अडथळे आणि विविध सामाजिक-राजकीय समस्या अशा अनेक आव्हानांचा सामना करावा लागत होता. अनेक लोकांच्या मते विकासाचा वेग अपेक्षेप्रमाणे नव्हता. या पार्श्वभूमीवर, सरकारने विविध सुधारणा आणि योजना राबवून प्रशासन अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला. यामुळे नागरिकांमध्ये जागरूकता वाढली आणि लोकशाही प्रक्रियेतील सहभाग अधिक सक्रिय झाला, असे काही विश्लेषकांचे मत आहे. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर देशात विविध क्षेत्रांमध्ये मोठे बदल झाल्याचे समर्थकांचे मत आहे. त्यांच्या मते, पायाभूत सुविधा, ऊर्जा, आरोग्य आणि गृहनिर्माण या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर काम झाले असून मेट्रो प्रकल्प, महामार्गांचे जाळे आणि रेल्वे सुधारणा यांना वेग मिळाला आहे. तसेच, शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचवण्याच्या दृष्टीने विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. जन धन योजना आणि डिजिटल पेमेंट प्रणालीमुळे थेट लाभ हस्तांतरण अधिक प्रभावी झाले. कुठल्याही भ्रष्टाचाराशिवाय आणि बोगस लाभार्थींना वगळून पैसे शेतकऱ्यांच्या आणि सामान्य जनांच्या खात्यात जमा होत आहेत. त्याचप्रमाणे, ग्रामीण आणि निमशहरी भागात पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी विविध रस्ते आणि वाहतूक प्रकल्प राबवले गेले आहेत. उडान योजनेमुळे हवाई प्रवास सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला आहे, तर वंदे भारत रेल्वे आणि मेट्रो विस्तारामुळे रेल्वे व शहरी वाहतुकीत सुधारणा झाल्याचे सांगितले जाते. समर्थकांच्या मते, या धोरणांमुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली असून भारताची जागतिक अर्थव्यवस्थेत भूमिका अधिक मजबूत झाली आहे. मोदी यांनी भारताला दीर्घकाळ छळणारा काश्मीरचा प्रश्न सोडवण्यात हातभार लावला आहे. त्यांनी भाजपची अनेक वर्षांची घोषणा पूर्ण करत कलम ३७० रद्द केले आणि ही समस्या कायमस्वरूपी सोडवली, असे मानले जाते. कलम ३७० रद्द झाल्यानंतर काश्मीरमध्ये एकही गोळी झाडली गेली नाही, कारण त्या वेळी केंद्रात मोदी आणि अमित शहा यांची सत्ता होती आणि त्यांनी तसा बंदोबस्त केला होता. याआधी काँग्रेसच्या काळात अल्पसंख्याकांबाबत धोरणे खूप सवलतीची असल्याची टीका केली जाते, ज्यामुळे सुरक्षा यंत्रणांना कठोर भूमिका घेणे कठीण जात असे. मात्र मोदी सरकारने हे चित्र बदलले आणि आज काश्मीरमध्ये दगडफेकीच्या घटना अत्यंत क

शाम्पूच्या वापरामुळे केसगळतीची समस्या वाढते का?



कधीकधी अचानक केस खूप गळत असल्याचे तुमच्या लक्षात येते.केस गळण्याचे कारण शोधताना मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपणे आपण रोज केस स्वच्छ धुण्यासाठी शाम्पूचा वापर करतो. त्यामुळे आपण वापरत असलेल्या शाम्पूमुळे तर केस गळत नाहीत ना? किंवा कोणता शाम्पू आपल्या केसांसाठी योग्य असू शकतो? हे प्रश्न आपल्याला पडू शकतात.

केस गळणे ही अनेकांना भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. मात्र केस गळण्याची कारणे प्रत्येक व्यक्तीमध्ये निरनिराळी असू शकतात. डॉ. अपूर्वा शाह यांनी त्यांच्या 'हॅव अ ग्रेट हेअर डे' या पुस्तकामध्ये शाम्पू केल्यामुळे केस गळत नाहीत किंवा तेलांमुळे केसांच्या त्वचेतील मुळे बंद होत नाहीत, असे मत मांडले आहे. त्याचप्रमाणे हेअर एक्सपर्ट जावेद हबीब यांनी देखील त्यांच्या 'हेअर योगा' या पुस्तकामध्ये शाम्पूच्या वापरामुळे केस गळत नाहीत, या सत्याचा उलगडा केला आहे.

अयोग्य शाम्पू वापरल्यामुळे मात्र तुमच्या केसांची मुळे नक्कीच कमजोर होऊ शकतात. त्यामुळे बरेच दिवस तुमचे केस गळत राहतात व केसांचे खूप नुकसान होते. यासाठी तुमच्या केसांच्या प्रकारानुसार योग्य शाम्पूचा वापर करणे गरजेचे आहे.



योग्य शाम्पू कसा निवडाल?

तुमच्या केसांचा प्रकार ओळखून योग्य शाम्पूची निवड करा. बाजारात अनेक ब्रॅण्डचे शाम्पू उपलब्ध असले तरी त्यातून तुमच्यासाठी योग्य प्रकारच्याच शाम्पूची निवड करा. त्याचप्रमाणे दर ४ ते ५ आठवड्यांनी तुमच्या शाम्पूचा ब्रॅण्ड बदला. सतत एकाच ब्रॅण्डचा शाम्पू वापरल्यामुळे तुमच्या केसांमधील त्वचेवर त्याचा दुष्परिणाम होतो व तुम्हाला हवा तसा योग्य बदल दिसून येत नाहीत.

योग्य शाम्पूची निवड करण्यासाठी आधी तुमच्या केसांचा प्रकार ओळखा –


- **ऑईली हेअर** – काही दिवस केसांमधील त्वचा तेलकट असते, पण केसांची शेवटची टोके कोरडी असतात.
- **ड्राय हेअर** – केस खरखरीत असतात, जे लवकर गुंततात व कुरळे किंवा फ्रिजी असतात.
- **नॉर्मल हेअर** – केसांचा पोत अति कोरडा अथवा अति तेलकटही नसतो.
- **डॅमेज हेअर** – या केसांमध्ये कोंडा किंवा केस दुभंगण्याची (स्प्लीट एण्ड) समस्या असते.
- **लीम्प हेअर** – केस सपाट असतात, ज्यांचा व्हॉल्युम जास्त नसतो किंवा केस फुललेले नसतात.

अॅल्युमिनियम फॉईलमध्ये पदार्थ का शिजवू नयेत?

जर तुम्ही दररोज जेवणासाठी अॅल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे.


नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून असे समोर आले आहे की अॅल्युमिनियम फॉईलमध्ये शिजवलेले अथवा गुंडाळलेले पदार्थ खाल्ल्याने शरीरावर परिणाम होतो.

जेव्हा अॅल्युमिनियम फॉईलमध्ये अन्न शिजवले जाते, त्यावेळी मोठ्या प्रमाणात अॅल्युमिनियम अन्नात मिसळते आणि हे अन्न खाल्ल्याने ते शरीरात जाते. यामुळे हाडांचे आजार तसेच ब्रेन सेल्सची वाढ कमी होण्याची शक्यता असते.



आवळा सरबत प्या, हे १० आजार टाळा

आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आवळा उत्तम आहे. आवळा सरबत घेतल्याने आपल्याला अनेक फायदे होतात. आपले आरोग्य चांगले राहते. आयुष्य वाढण्यास मदत होते. आयुर्वेदातही आवळ्याला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. आवळा सरबतात मध मिसळले तर अधिक चांगले. तसेच आवळा ज्यूसमुळे महिलांच्या पाळीची समस्या दूर होण्यास मदत होते.



- आवळा ज्यूस आणि मध एकत्र करून प्यायल्याने दम्याचा प्रभाव कमी होतो.
- रक्त शुद्ध करण्यासाठी आवळा सरबत आणि मध खूप गुणकारी आहे.
- आवळा सरबत नियमित घेतल्यास कोलेस्ट्रॉल कमी होते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका टळण्यास मदत होते.
- आवळा खाण्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. कारण मेटाबॉलिजम व्यवस्थित होऊन वजन कमी होते.
- आवळा हा पाचक आहे. त्यामुळे पचन व्यवस्था व्यवस्थित राहते.
- आवळा सरबत प्यायल्याने चेहऱ्याला ग्लो येतो. तसेच त्वचारोग दूर होण्यास मदत होते.
- लघवीचा ज्यांना त्रास आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. सरबत प्यायल्याने लघवीसंबंधीचे आजार दूर होतात.
- ज्यांना किडनी स्टोनचा आजार आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. मूतखड्याचा आजार दूर होण्यास मदत होते.
- आवळ्यामुळे मधुमेह (Disbetes) नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- सतत तोंड येत असेल तर आवळा सरबत प्यायल्याने ही समस्या दूर होते. तसेच डोळ्यांची शक्ती वाढण्यास मदत होते.

स्पेशल पुदिना राईस

साहित्य : २ वाटी तांदूळ, २ वाटी पुदिन्याचे पाने निवडून व धुऊन, फोडणीसाठी तमालपत्र, जिरे, पाच ते सहा लसूण पाकळ्या, अंदाजे मीठ, लाल मिरची फोडणीसाठी.

कृती : पुदिना व लसूण पेस्ट बनवून घ्या. तांदळाचा मोकळा भात शिजवून थंड होऊ द्या. पुलाव मसाला लहान १ चमचा, गरम पॅनमध्ये तेल, जिरे, तमालपत्र व मिरची घालून फोडणी द्या. त्यावर वाटलेला पुदिना घाला व परत पुलाव मसाला घाला. चांगले परतून शिजवलेला भात घाला. मीठ घाला, परतून वाफ येऊ द्या. खोबऱ्याचा किस व पुदिना पाने लावून सजवा व खायला वाढा. यामध्ये मिक्स पालक थोडी वाफवून व वाटून आपण घालू शकता.



चमकदार त्वचेसाठी हे स्क्रब वापरून बघा



आपल्या चेहऱ्यावरील चमक हळूहळू कमी होत आहे, तर काळजी करू नका. आम्ही आपल्याला काही घरगुती स्क्रबबद्दल सांगत आहोत ज्यांना वापरून आपण आपल्या चेहऱ्यावरील चमक परत मिळवू शकता. चला तर मग वेळ न गमावता जाणून घेऊया की, आपण घरगुती स्क्रब कसा तयार करू शकता...

साखर आणि लिंबू – एक चमचा साखर घेऊन त्यामध्ये अर्धा चमचा लिंबाचा रस मिसळा. आता हळुवार हाताने याला आपल्या चेहऱ्यावर लावा आणि काही वेळ स्क्रब करून आपला चेहरा स्वच्छ धुवा.

संत्र्याच्या सालीचे स्क्रब – संत्र्याची साल आपल्या त्वचेला तजेलपणा आणण्यासाठी उपयुक्त आहे. यासाठी आपल्याला संत्र्याच्या सालीला वाळवून वाटून भुकटी करायची आहे. या भुकटीमध्ये थोडेसे कच्चे दूध मिसळून आपण चेहऱ्यावर लावू शकता. संत्र्याच्या सालाची भुकटी किंवा पावडर चांगले स्क्रब म्हणून काम करतं.



तांदळाच्या पिठाचे स्क्रब – तांदळाचे पीठ आणि दही सम प्रमाणात मिसळून घ्या. आता हे चेहऱ्यावर लावून हळुवार हाताने मालिश करा आणि काही वेळ तसेच ठेवून नंतर स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या.

बेकिंग सोडा स्क्रब – घरच्या घरी आपला चेहरा उजळवायचा असल्यास २ मोठे चमचे बेकिंग सोडा, १ लहान चमचा दालचिनी पूड, अर्धा लिंबाचा रस आणि मध मिसळा. या पेस्टला आपल्या त्वचेवर ५ मिनिटे लावा. लक्षात ठेवा की या पेस्टचा वापर आठवड्यातून दोन वेळापेक्षा जास्त करू नये.

पेरूची पानेदेखील उपयुक्त असतात, नक्की वाचा याचे फायदे

पेरू औषधी गुणधर्माने समृद्ध आहे. याच्या सेवनाने बरेच आरोग्यदायी फायदे मिळतात. उलट्या रोखण्यासाठी पेरू फायदेशीर आहे तसेच हृदयरोगापासूनदेखील बचाव होतो. तसे तर हे भारतात मिळणारे एक साधे फळ आहे, ज्याचे प्राचीन संस्कृत नाव अमृत किंवा अमृत फळ आहे. वाराणसीमध्ये याला लोक अमृत नावानेच संबोधित करतात. पेरूप्रमाणेच त्याची पानेदेखील खूप उपयुक्त असतात. यामध्ये अँटी ऑक्सिडन्ट, अँटी बॅक्टेरियल आणि अँटी इन्फ्लमेन्टरी गुणधर्म असतात, जे आपले अनेक आजारांपासून संरक्षण करतात. चला जाणून घेऊया पेरूच्या पानाचे फायदे.

पोटदुखी आणि उलट्यामध्ये आराम देतो : पेरूच्या पानात अँटी बॅक्टेरियल गुणधर्म असतात, याच्या पानाच्या पाण्याचे सेवन केल्याने आपल्या पोटाचे दुखणे दूर होऊ शकते. तसेच उलट्यापासून देखील आराम मिळतो. यासाठी पेरूच्या ५-६ पानांना १० मिनिटे उकळवून घ्या आणि नंतर गाळून त्याचे पाणी प्या.

सांधेदुखीचा त्रास दूर होतो : सांधेदुखीमध्येदेखील पेरूची पाने फायदेशीर आहेत. यासाठी आपण पेरूची पाने वाटून त्याचा लेप बनवा आणि त्या लेपाला सांध्यावर लावा, यामुळे आपल्याला वेदनेपासून आराम मिळेल.

मधुमेहातदेखील फायदेशीर : पेरूची पाने पाण्यात टाकून प्यायल्याने हे मधुमेहासाठी फायदेशीर मानले जाते. वास्तविक हे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करतं. याशिवाय हे शरीरातील जटिल स्टार्च साखरेमध्ये बदलण्यापासून रोखते, ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

दातदुखी, हिरड्यांची सूज कमी करते : पेरूच्या पानाचे पाणी दात दुखणे, हिरड्यांची सूज आणि तोंड येण्यापासून आराम देण्याचे काम करते. यासाठी पाने उकळवून त्या पाण्याने गुळण्या करा. असे केल्यास आपल्याला आराम मिळेल.

बद्धकोष्ठता आणि गॅसच्या त्रासापासून मुक्ती मिळवण्यासाठी लसूण एक चमत्कारी औषध ठरेल. आयुर्वेदात लसूण हे चमत्कारिक गुणधर्म असलेले औषध म्हणून वर्णिले आहे, याचे बरेच फायदे आहेत. हे फक्त जेवण्याची चवच वाढवत नाही, तर शरीरास निरोगी ठेवण्यासदेखील मदत करते. याच कारणामुळे बऱ्याच घरगुती उपचारांमध्ये लसणाचा वापर केला जातो.

उपाशीपोटी लसूण खाण्याचे फायदे



वास्तविक लसणामध्ये अनेक प्रकारच्या पोषक घटकांचा समावेश आहे. यामध्ये कॅल्शियम ते तांबे, पोटॅशियम, फॉस्फरस, आयर्न आणि व्हिटॅमिन ई १ इत्यादींचा समावेश आहे. आपण लसणाचा वापर कोणत्याही प्रकारे करू शकतो. ते फायदेशीर आहेच; पण उपाशीपोटी खाल्ल्याने हे खूप फायदेशीर आहे. चला उपाशीपोटी याच्या सेवनाचे फायदे जाणून घेऊया.

रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतं –

लसणाला प्रतिकारकशक्ती बळकट करण्यासाठी प्रभावी मानले आहे. अभ्यासात आढळून आले आहे की जे लोक दररोज लसणाचे सेवन करतात, त्यांना इतर लोकांपेक्षा सर्दी-पडसे कमी होते. सकाळी उपाशीपोटी त्याचे सेवन करणं जास्त फायदेशीर आहे.

उच्च रक्तदाब असल्यास फायदेशीर –

ज्या लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या आहे, त्यांनी दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन करावे, कारण यामध्ये रक्तदाब नियंत्रित करण्याचे गुणधर्म आढळतात. लसूण चावून खाल्ल्याने उच्च रक्तदाबात आराम मिळतो.

हृदयाचा धोका कमी होतो –

लसूण हृदयरोगाच्या धोक्याला कमी करतं. जर हृदयाच्या रोगापासून वाचायचे असल्यास दररोज सकाळी लसणाचे सेवन करावे. मधासहदेखील लसणाचा सेवन करू शकतो. यामुळे रक्ताभिसरण योग्य राहते.

पोटाशी निगडित त्रासापासून सुटका –

दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन केल्यास पोटाशी निगडित त्रास जसे की बद्धकोष्ठता आणि गॅसपासून आराम मिळू शकतो. यामुळे पाचक प्रणालीदेखील चांगली राहील. जे लोक ॲसिडिटीच्या त्रासामुळे त्रस्त झाले आहेत, त्यांना भाजके लसूण खाण्याचा सल्ला दिला जातो.

उच्च रक्तदाब नियंत्रणासाठी सोप्या टीप्स



संशोधनात असे आढळून आले आहे की, दहामधून सात तरुणांना ब्लडप्रेशर जास्त असल्यामुळे हार्ट ॲटॅक किंवा स्ट्रोक येण्याची शक्यता जास्त असते. झोप कमी होणे, स्ट्रेस, डिप्रेशन, जास्त मीठ असलेले फास्ट फूड आणि डेस्क जॉब ही याची मुख्य कारणे आहेत. म्हणून...

- आठवड्यातून ३-४ दिवस कमीत कमी २० मिनिटे जॉगिंग करावी. जॉगिंग केल्याने ऑक्सिजन घेण्याच्या प्रक्रियेत सुधारणा होते आणि ब्लडप्रेशर नियंत्रित राहतो.
- रोज कमीत कमी ३० मिनिटांचे ब्रिस्क वॉक करावे.
- एरोबिक केल्याने हाय ब्लडप्रेशर कमी होते.
- तणावरहित राहण्यासाठी प्राणायाम, कपालभाती करावे.

किचन स्वच्छ ठेवण्यासाठी काही टीप्स

दररोज नोकरी किंवा व्यवसायामुळे आपल्याला आपल्या कामामधून वेळ मिळत नाही. अशा वेळी आपल्याला दररोज किचन साफ करणे जमत नाही. त्यामुळे ज्या गृहिणी कामामध्ये व्यस्त असतात, अशा गृहिणींसाठी काही खास टीप्स...



- **डायनिंग टेबल :** डायनिंग टेबल हे दररोजच्या जेवणामुळे घाण झालेले असते. त्यामुळे डायनिंग टेबलला स्वच्छ करण्यासाठी नीलगिरीच्या तेलाचा वापर करू शकता. टेबलमधून दुर्गंधी येत असल्यास एखाद्या कापडावर नीलगिरी तेलाचे काही थेंब टाकून त्याने पुसून घ्या.
- **फ्रीज:** फ्रीजचे दार उकडलेल्या बटाट्याच्या सालींनी स्वच्छ केले जाऊ शकते.
- **नळ :** किचनमधील नळ चकचकीत करण्यासाठी त्यावर थोडीशी टूथपेस्ट लावा आणि गरम पाण्याने धुऊन टाका.
- **कचऱ्याचा डबा :** किचनमध्ये जिथे कचऱ्याचा डबा ठेवतो, ती जागा नियमितपणे फिनेल टाकून स्वच्छ करावी. कारण सर्वात जास्त घाण त्या जागेवर जमते. त्यामुळे बॅक्टेरिया पसरतात. किचनमध्ये नेहमी झाकण असलेले कचऱ्याचे डबे वापरा.
- **मिक्सर :** मिक्सर वापरताना तो वापरून झाल्यावर त्यावरील घाण साफ करून त्याला कव्हर घालून ठेवा. त्यामुळे त्यावर धूळ जमा होत नाही.
- **स्टोव्ह :** स्टोव्ह स्वच्छ करण्यासाठी संत्र्याचे साल वापरा. त्याने स्टोव्हला रॉकेलचा जास्त वास येत नाही.

वजन कमी करण्यासाठी दिवसाला किती पोळ्या खाव्यात?

आपल्या दररोजच्या कॅलरीच्या प्रमाणाला लक्षात घेता पोळी किंवा भाकरीचे सेवन करावे. यामुळे आपल्या वाढत्या वजनाला कमी करण्यास मदत मिळेल. वजन कमी करण्यासाठी लोक आपल्या आहाराची काळजी घेतात. वास्तविक शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी कार्बोहायड्रेट घेणे टाळावे लागते. कार्बोहायड्रेटमुळे वजन झपाट्याने वाढते. पण कार्बोहायड्रेट हे आवश्यक मायक्रोन्यूट्रिएंट आहे, ज्याला वगळून चालणार नाही.



भारतातील आहाराबद्दल बोलायचे झाल्यास पोळी आणि भात हे कार्बोहायड्रेटचे चांगले स्त्रोत आहेत. जवळजवळ प्रत्येक घरात भात आणि पोळ्या नियमितपणे लोक खातात. परंतु जेव्हा वेळ येते वजन कमी करण्याची, तेव्हा लोकांना हे जाणून घ्यायचे असते की, दररोज किती पोळ्या खाव्या, जेणेकरून वजन वाढणार नाही. चला तर मग जाणून घ्या -

गव्हामध्ये पौष्टिक घटक आढळतात :

पोळ्यांमध्ये फक्त कार्बोहायड्रेटचं नव्हे तर इतर आवश्यक पोषक घटक देखील आढळतात. गहू हा प्रथिने, फॅट, फॉस्फरस, मॅग्नेशियम, फॉलेट आणि लोहाचा सर्वात चांगला स्त्रोत आहे. पोळी किंवा चपाती खाल्ल्याने शरीरास सर्व पोषक घटक मिळतात.

दिवसात किती पोळ्या किंवा भाकऱ्या खाव्या?

कार्बोहायड्रेट, प्रथिनं आणि फॅट किंवा चरबीला मायक्रोन्यूट्रिएंट म्हणतात. शरीरातील विविध कार्ये करण्यासाठी आपल्या शरीरास यांची गरज पडते. सर्वप्रथम आपल्याला हे ठरवावे लागणार की आपल्याला दररोज किती प्रमाणात कार्बोहायड्रेट घ्यायचे आहे. त्यानुसारच आपण दिवसाचा पोळीचा किंवा भाकरीचा आहार ठरवावा. ६ इंचाच्या लहान पोळीमध्ये ७१ कॅलरी आढळते. आपण दुपारच्या जेवणात ३०० कॅलरी घेतो, तर आपण दोन पोळ्या खाऊ शकतो. यापासून आपल्याला १४० कॅलरीज मिळतात आणि बाकीच्या कॅलरी आपल्याला सॅलड आणि भाज्यांपासून मिळते. लक्षात ठेवा की पोळीशिवाय आपण ज्या भाज्या आणि फळ घेत आहात त्यांच्यामध्ये देखील कार्बोहायड्रेट आढळते. म्हणून आपल्या कॅलरीच्या सेवन करण्यावरच हे अवलंबून आहे की आपल्याला दिवसात किती पोळ्या खायला हव्या. दिवसातून चार पोळ्या खाणे वजन कमी करण्यासाठी चांगले मानले जाते.

पोळीचे इतर पर्याय :

जर आपण वजन कमी करण्यासाठी प्रयत्नरत आहात, तर आपण गव्हाच्या पोळीव्यतिरिक्त ज्वारीची किंवा बाजरीची भाकरी देखील खाऊ शकता. या भाकऱ्या गव्हाच्या पोळीपेक्षा आरोग्यवर्धक असतात आणि यामध्ये कार्बोहायड्रेट कमी तर इतर पोषक घटक मुबलक प्रमाणात असतात.

हे लक्षात घ्या :

आहारात फक्त कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी केल्याने वजन कमी होत नाही. यासाठी आपल्याला इतर गोष्टी जशा की आपली जीवनशैली, झोपण्याची पद्धत आणि नियमितपणे व्यायामाची दिनचर्या या गोष्टी देखील आवश्यक आहेत. निरोगी आणि संतुलित आहारासह या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवं.

फोनमध्येच भारी फोटो कसे काढाल? 'या' सोप्या टीप्स करा फॉलो

आजकाल आपण कुठेही फिरायला गेलो तर तिथे सर्वात जास्त कोणतं काम करत असू तर ते फोटोग्राफी. म्हणजे प्रत्येक गोष्टीचे फोटो काढून ते सोशल मीडियावर आपण अपलोड करतच असतो. त्यात आता ते दिवस गेले जेव्हा लोक त्यांच्या आठवणी टिपण्यासाठी अर्थात फोटो काढण्यासठी मोठमोठे कॅमेरे वापरत होते. आता यासाठी बहुतेक जण मोबाईल फोनच वापरतात. तसेच, स्मार्टफोन कॅमेरे देखील दिवसेंदिवस सुधारत असताना, त्यापैकी बरेच जण जवळजवळ डीएसएलआरसारखे फोटो देतात.तर आज आम्ही तुम्हाला मोबाईल फोटोग्राफीच्या अशाच काही टीप्स आणि युक्त्या सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही स्वस्त स्मार्टफोनमध्येही कॅमेऱ्यासारखे भारी फोटो काढू शकता.

स्मार्टफोनचा कॅमेरा कसा आहे ते आधी समजून घ्या

स्मार्टफोन वापरून चांगले फोटो कॅप्चर करण्यासाठी सर्वात आधी तुम्हाला तुमच्या फोनचा कॅमेरा कसा आहे म्हणजेच त्याची क्षमता किती आहे ते जाणून घेणं गरजेचं आहे. कारण फोनचं कॅमेरा सेटअप जसं असेल त्यानुसारच फोटो येणार आहेत. पण आम्ही सांगणाऱ्या टीप्समुळे तुम्ही तुमच्या फोनच्या कॅमेऱ्याचा पुरेपुर वापर करून फोटो क्लिक करू शकता. आजकाल बहुतेक आधुनिक फोन अनेक लेन्स सेटअपसह येतात जे वापरकर्त्यांना अल्ट्रा-वाइड अँगल लेन्स, टेलीफोटो लेन्स, डेडिकेटेड पोर्ट्रेट लेन्स, मॅक्रो लेन्स हे सर्व ऑफर करतात. या सर्वांच्या मदतीने तर फोटोज आणखीच भारी येतात.

फोटो काढताना फ्रेमवर खास लक्ष द्या

तुम्ही कोणत्याही वस्तूचा किंवा व्यक्तीचा फोटो घेत असाल तर तो पूर्णपणे फ्रेममध्ये योग्यरीत्या असेल हे लक्षात ठेवा. म्हणजेच ऑब्जेक्ट फ्रेममध्ये चांगला आला पाहिजे आणि अंतरही अधिक नसावं. तसंच कॅमेऱ्याची उंची योग्यरीत्या सेट करून परफेक्ट फ्रेममध्ये फोटो काढावा.

तुमची लेन्स स्वच्छ करा

ही एक अत्यंत सोपी ट्रिक असली तरी नक्कीच प्रभावी अशी ट्रिक आहे. कारण स्मार्टफोनच्या कॅमेरा लेन्स दिसतात, त्याहूनही अधिक घाण असतात. त्यामुळे त्या पूर्णपणे स्वच्छ केल्याने तुम्हाला चांगले आणि डिटेल्ड फोटो मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे फोटो काढण्यापूर्वी स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याची लेन्स नीट साफ करावी. कायमच लेन्सची काळजी घेणं फायद्याचं आहे.

दोन्ही हात वापरा

चांगला फोटो काढण्यासाठी नेहमी दोन हात वापरा, जेणेकरून तुमची फोनवरील पकड चांगली होईल आणि तुम्ही ऑब्जेक्ट आरामात कॅप्चर करू शकता. फोनवरील पकड चांगली असल्याने फोटो घेताना फोन हलणार नाही, ज्यामुळे फोटोही ब्लर किंवा चुकीच्या अँगल, फ्रेममध्ये येणार नाही. त्यामुळे दोन्ही हातांचा वापर करून फोटो काढणे, ही एक भारी ट्रिक आहे.

अतिरिक्त प्रॉडक्ट्स वापरा

डीएसएलआर कॅमेऱ्यांप्रमाणे, फोनसाठीही अतिरिक्त प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. जसं की, ट्रायपॉड, रिंग लाइट आणि अतिरिक्त लेन्स अशा विविध प्रॉडक्ट्सचा शक्य असल्यास वापर करावा. या सर्व उपकरणांच्या मदतीने फोटो अधिक भारी येतील. ट्रायपॉडने फोटो स्थिर येतील. रिंग लाईट प्रकाश ॲडजेस्ट करेल.



झूमचा योग्य वापर

फोटो घेण्यासाठी झूम या फीचरचा वापर योग्यरीत्या आणि जपून वापरा. कारण अधिक झूम केल्याने फोटोची क्लीॲरिटी खराब होते. त्यामुळे आवश्यक आणि शक्य असल्यास फोटो घेत असलेल्या ऑब्जेक्टच्या जवळ जा. अधिक झूममुळे फोटोचे रिझोल्युशन खराब होऊ लागते आणि स्वस्त फोनमध्ये डिजिटल झूम फारसे चांगले नसते. तसेच स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असलेले वेगवेगळे मोड वापरा जेणेकरून फोटो अधिक चांगले येतील. मोबाईल फोनमध्ये पोर्ट्रेट, नाईट, प्रो आणि स्लो-मो असे अनेक पर्याय आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही चांगला फोटो काढू शकता.

योग्य फोकसही महत्त्वाचा

फ्रेमिंग ही देखील महत्त्वाची गोष्ट आहे. हे आम्ही वरच सांगितलं. फोटो काढताना ऑब्जेक्टला योग्य ठिकाणी ठेवणं महत्त्वाचं आहे. तसंच फोकसही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कारण फोटो काढताना फोकस योग्यरीत्या केल्यावर ऑब्जेक्टचा फोटो अधिक भारी आणि क्लीअर येईल. फ्रेममधून अनावश्यक वस्तू काढून टाकण्यासह फोकसिंग ही एक अत्यंत उपयोगी टीप आहे.

एचडीआर मोडचा वापर

हाय डायनॅमिक रेंज म्हणजेच एचडीआर या मोडच्या मदतीने तुम्ही भारी भारी दर्जाचे फोटो क्लिक करू शकता. म्हणजेच तुम्ही एखादा मोठा फोटो क्लिक करत असाल तर अशा वेळी तुम्ही एचडीआर वापरू शकता. यासह, तुम्हाला तुमच्या फोटोमध्ये बरेच तपशील पाहायला मिळतील. एचडीआर एकाधिक एक्सपोजर कॅप्चर करते आणि फोटोच्या प्रकाश आणि गडद भागांमध्ये चांगले संतुलन राखते. एचडीआरमध्ये पार्क, इमारत, मंदिर किंवा मोठ्या वस्तूचा फोटो क्लिक करणे एक चांगला पर्याय आहे.

पावसाळा तोंडावर विद्यार्थ्यांनी कुठे बसायचे? पालक आणि शिक्षकांना पडला प्रश्न

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

जव्हार तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वावर वांगणी अंतर्गत येर्णाया जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सागपाणी येथे १५ जूनपासून शाळा सुरू होणार आहे. परंतु शाळेची इमारतच अजून बांधलेली नाही. जुन्या इमारतीचे बांधकाम पाडून टाकल्यापासून जागेवर फक्त विटा आणि मलब्याचा ढीग पडून आहे. पावसाळा तोंडावर आला तरी नव्या बांधकामाला सुरुवात झालेली नाही. सागपाणी जिल्हा परिषद शाळेची अवस्था पाहून शाळा सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांनी नेमके कुठे बसायचे, असा प्रश्न पालक आणि शिक्षकांना पडला आहे. सध्या येथे एक वर्गखोली आहे. परंतु येथील सध्या ४१ विद्यार्थी शिकत



सागपाणी जिल्हा परिषदेतील त्या शाळेचं नेमकं काय प्रकरण?

"सागपाणी शाळेच्या मुख्याध्यापका आणि इंजिनीरिंग यांना आज तात्काळ बोलवून चौकशी मी केली आहे. सध्या एक वर्गखोली आहे .या इमारतीचा आजच प्रस्ताव जिल्ह्याला पाठवायला सांगितला आहे. याचा पाठपुरावा करणे चालू आहे.
-वसंत महाले, गटशिक्षणाधिरी, पंचायत समिती जव्हार

प्रशासनाने तातडीने दखल घेऊन १५ जूनपूर्वी शाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करावे किंवा पयार्यी व्यवस्था करावी. अन्यथा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईल आणि आदिवासी भागातील शिक्षणाची अवस्था अधिकच बिकट होईल.
-सुनिल जाबर, सामाजिक कार्यकर्ते, सागपाणी ग्रामस्थ"

आहेत त्यामुळे ४१ विद्यार्थ्यांना एकच वर्ग खोलीत बसने अशक्य आहे. त्यामुळे या कमी जागेत लहान मुलांना बसवणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे आहे.

''येथील ग्रामस्थांनी अनेकदा शिक्षण विभाग आणि बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला. मात्र ही इमारत दुरुस्ती साठी मंजूर आहे लवकरच काम सुरू होईल'' अशीच उत्तरे मिळाली होती. परंतु आता शाळा पाडून महिन्यांवर महिने उलटले तरी ठेकेदाराने कामाला सुरुवात केलेली नाही.मात्र आज सुनिल जाबर याने परत चौकशी केली असता इमारतीचे नवीन बांधकाम करावे लागेल, अशी उत्तरे शिक्षण विभाग जव्हारकडून देण्यात आले. परंतु ही इमारत मंजूर झालेली होती तर मग काम का चालू केले नाही. दुर्सया ठेकेदाराने इथे साहित्य टाकले होते आणि काम पण चालू केले होते,परंतु ठेकेदारामध्येच वाद झाल्याने हे काम केले नाही.या वर्षी या इमारतीचे बांधकाम करायचेच नव्हते तर मग ही इमारत पाडली का?तसेच ही इमारत पाडल्याने अंगणवाडी सुद्धा दुरुस्ती करणे आवश्यक आहे, कारण जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडी शाळेचे भिंत एकच होती, त्यामुळे याला सुद्धा धोका आहे.

सागपाणी हा अतिदुर्गम आदिवासी भाग आहे. येथे पावसाळ्यात जोरदार पाऊस पडतो. अशा परिस्थितीत जर शाळेची इमारत उभी राहिली नाही, तर विद्यार्थ्यांना झाडाखाली, उघड्यावर किंवा तात्पुरत्या शेडमध्ये बसावे लागणार आहे. ''पावसाळ्यात पाणी साचते, चिखल होतो. लहान मुले आजारी पडतील. ऑनलाइन शिक्षणाची सोय नाही, मग ही मुले कुठे जाणार?'' अशी चिंता येथील ग्रामस्थांनी व्यक्त केली. शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक मुलाला सुरक्षित आणि योग्य वातावरणात शिक्षण मिळणे आवश्यक आहे. मात्र सागपाणीच्या या शाळेत मूलभूत सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्कच धोक्यात आला आहे.

महाराष्ट्रात खळबळ उडवून दिलेल्या नसरापूर खटल्याची सुनावणी अंतिम टप्प्यात

■पुणे। प्रतिनिधी,



संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून दिलेल्या नसरापूर येथील चिमुकलीवरील अत्याचार आणि खून खटल्याची सुनावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. या प्रकरणात आतापर्यंत ५३ जणांच्या साक्षी नोंदवल्या आहेत. त्यात अत्यंत महत्त्वपूर्ण पुरावे रेकॉर्डवर आले आहेत. यामध्ये वैद्यकीय पुरावे, वैज्ञानिक माहिती, बाल-साक्षीदाराची साक्ष आणि डीएनए प्रोफायलिंग या बाबींचा समावेश आहे. उर्वरित दोन साक्षीदार एक सायबर तज्ज्ञ आणि मुख्य तपास अधिकारी (आयओ) यांच्या साक्षी नोंदवण्याचे काम सोमवारी (दि. १५) सुरू होणार आहे. दररोज चाललेल्या सुनावणीमुळे या खटल्याचा निकाल महिनाभराच्या आतच लागण्याची शक्यता असून, राज्याच्या इतिहासातील हा सर्वात जलद चाललेला खटला ठरू शकेल, असा विश्वास विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी व्यक्त केला. नसरापूर परिसरात दि. १ मे रोजी एका निष्पाप साडेतीन वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिचा खून केल्याची घटना घडली होती. या प्रकरणात आरोपी भीमराव कांबळे या नराधमाला अटक करण्यात आली होती. विशेष न्यायालयात या खटल्याचे कामकाज सुरू आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास पूर्ण करून जिल्हा न्यायालयात ११०० पानांचे दोषारोपपत्र दाखल केले. २९ मे रोजी न्यायालयात प्रत्यक्ष साक्ष नोंदवण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. पहिल्या दिवशी पीडितेच्या आई-वडिलांची साक्ष नोंदवली गेली. या खटल्यात आजमितीला एकूण ५३ साक्षीदार तपासून झाले आहेत. न्यायालयात तांत्रिक व डिजिटल पुराव्यांशी संबंधित 'इ-साक्ष' पोर्टलवरील साक्षीदार, घटनेची पुनर्रचना (सीन रिक्रिएशन) करणारे पंच आणि सीसीटीव्ही चित्रीकरण जप्त करणारे पंच अशा महत्त्वाच्या साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली.

ब्रेक, स्टेअरिंग नीट हाताळा! दुचाकीस्वारांना क्रॉस करू नका! सुमारे ७ हजारांहून अधिक चालकांचे 'बेस्ट काऊन्सलिंग'

■मुंबई । प्रतिनिधी,

हँड ब्रेक, क्लच अन् स्टेअरिंग हाताळताना दक्षता घ्यावी. मुंबई शहरातील रस्त्यांवर बेस्ट बसचा स्पीड लिमिटेडच ठेवा तसेच बस डेपोच्या बाहेर काढताना योग्य ती तपासणी करून द्यावी तसेच रस्त्यांवर दुचाकी जात असेल तर ओव्हरटेक करू नका, अशा प्रकारचे बेस्ट उपक्रमातील सुमारे ७ हजारांहून अधिक चालकांचे समुपदेशन करण्यात येत असल्याचे बेस्ट उपक्रमाकडून सांगण्यात आले.

कुर्ला, भांडुप, दादर, कांदिवली येथे बेस्ट बसेसचे अपघात झाले. विशेष म्हणजे हे सगळे अपघात भाडेतत्त्वावरील बसेसचे झाल्याने भाडेतत्त्वावरील बसेसवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुंबईकरांची दुसरी लाइफलाइन म्हणून बेस्ट बसची जगभरात ओळख आहे. बेस्ट बसचे सद्यस्थितीत २५ लाख



प्रवासी बेस्ट बसेसना पसंती देतात.

बेस्ट बस तीन शिफ्टमध्ये चालवल्या जातात. एका बसवर तीन चालक सेवा देतात. प्रति तास ६० किमी वेगमयार्दा असून सात हजार चालकांचे अपघात टाळण्यासाठी समुपदेशन केले जात आहे, असे बेस्ट उपक्रमाकडून सांगण्यात आले.

वाहनचालक, पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न

बेस्टच्या मालकीच्या व भाडेतत्त्वावरील वातानुकूलित इलेक्ट्रिक बसेस व विना वातानुकूलित अशा २ हजार ७०० बसेस आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत बेस्ट बसेसच्या विशेष करून भाडेतत्त्वावरील बसेसच्या अपघातात वाढ झाली आहे. त्यामुळे दुचाकी व पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कंत्राटी व स्वमालकीच्या बसेसवर सुमारे ७ हजार चालक कार्यरत असून त्यांना दिंडोशीत महिनाभर प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर अपघात टाळण्यासाठी समुपदेशन केले जात आहे.

अनधिकृत विक्रेत्यांचे धाबे दणाणले...

रेल्वे प्रशासनाने 305 जणांना घेतलं रंगेहात ताब्यात



■पुणे। प्रतिनिधी,

रेल्वे प्रवास करताना रेल्वेमध्ये खाद्यपदार्थ विक्रेते येत असतात. यातील बऱ्याच जणांकडे परवाना नसतो. अशावेळेस अनेकदा हे अनधिकृत खाद्यपदार्थ विक्रेते प्रवाशांच्या आरोग्याशी खेळतात. याच विनापरवाना घुसखोरी करणाऱ्या अनधिकृत खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. भुसावळ रेल्वे विभागाच्या वाणिज्य शाखा आणि रेल्वे सुरक्षा दलाने संयुक्त 'सर्जिकल स्ट्राईक' करत तब्बल ३०५ अनधिकृत विक्रेत्यांना रंगेहात पकडले आहे. गेल्या १५ दिवसांपासून ही कारवाई सुरु आहे. या धडक मोहिमेमुळे रेल्वे स्थानक आणि गाड्यांमधील अनधिकृत फेरीवाल्यांचे धाबे दणाणले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६७ जणांवर थेट दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून तब्बल ९७ हजार ९५० रुपये दंड वसुलण्यात आला आहे.

तीन रेल्वे मार्गांवर 'क्लीन स्वीप'

भुसावळ रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, २८ मे ते १० जून या कालावधीत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. प्रवाशांच्या आरोग्याशी होणारा खेळ लक्षात घेता त्यासोबतच प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि दजेर्दार अन्न मिळावे हा यामागचा मुख्य हेतू होता. या मोहिमेत मुख्यत्वे तीन रेल्वे कॉरिडोअर्सवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले होते. यामध्ये भुसावळ - खंडवा विभाग, भुसावळ - नाशिक विभाग, भुसावळ - बडनेरा विभाग या मार्गांवर धावणाऱ्या एक्स्प्रेस आणि प्रमुख स्थानकांवर आरपीएफच्या जवानांनी आणि वाणिज्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून या अनधिकृत विक्रेत्यांची धरपकड केली.

'१३९' वर करा थेट तक्रार

प्रवाशांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत केवळ अधिकृत आणि परवानाधारक स्टॉल्स किंवा विक्रेत्यांकडूनच खाद्यपदार्थांची खरेदी करावी. प्रवासात कुठेही खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका आल्यास किंवा अनधिकृत विक्री आढळल्यास तात्काळ रेल्वेच्या १३९ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा 'रेलमदद' पोर्टलवर तक्रार नोंदवावी. असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, रेल्वे प्रवाशांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असून, अशी कारवाई भविष्यातही आणखी तीव्रतेने सुरूच राहील, असा थेट इशारा भुसावळ रेल्वे प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे अनधिकृत विक्रेत्यांना मोठा झटका बसला आहे.

दक्षिण मुंबईतील शाळा अनधिकृत... शिक्षण निरीक्षकांकडून टाळे ठोकण्याचे आदेश

■मुंबई । प्रतिनिधी,

दक्षिण मुंबईतील नामांकित आणि उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या काही इंग्रजी माध्यमाच्या शाळा आणि त्यांमधील काही वर्ग अनधिकृतरीत्या (बेकायदेशीर) चालवले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

शिक्षण विभागाने या गंभीर बाबीची दखल घेत संबंधित शाळांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, हे अनधिकृत वर्ग आणि शाळा तत्काळ बंद करण्याचे निर्देश दक्षिण मुंबई विभागाच्या शिक्षण निरीक्षकांनी दिले आहेत. शैक्षणिक वर्ष सुरू असतानाच शिक्षण विभागाने केलेल्या या धडक कारवाईमुळे पालकांमध्ये प्रचंड गोंधळ आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिक्षण विभागाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, दक्षिण मुंबईतील अत्यंत गजबजलेल्या भागातील सहा इंग्रजी माध्यमाच्या शाळांना शासनाची कोणतीही मान्यता नसल्याचे स्पष्ट झाले आहे. एकाही वर्गाला मंजुरी नसताना या शाळा बेधडकपणे सुरू होत्या.



यामध्ये क्रॉफर्ड मार्केट, मशीद बंदर येथील मदनी हायस्कूल, ताडदेव तुळशीवाडी येथील युसुफ मेहर अली हायस्कूल, धारावी ९० फीट रोडवरील मदर तेरेसा हायस्कूल, धारावीतीलच संत कक्कैया मार्गावरील गणेश विद्यामंदिर, वडाळा पूर्व येथील ऑक्झिलम इंटरनॅशनल स्कूल आणि गोपालराव देशमुख मार्गावरील फिनलँड इंटरनॅशनल स्कूल या शाळांचा समावेश आहे. या सर्व शाळांना एकाही वर्गासाठी मान्यता नसल्याने त्या पूर्णपणे बेकायदेशीर ठरवण्यात आल्या आहेत.

तसेच काही मान्यताप्राप्त शाळांमध्येही वर्ग बेकायदेशीरपणे भरवले जात असल्याचे शिक्षण निरीक्षकांच्या तपासणीत उघड झाले आहे. यामध्ये मशीद मार्गावरील मोहम्मदीया हायस्कूलमध्ये इयत्ता पहिली ते पाचवी आणि नववी ते दहावीच्या वर्गांनाच अधिकृत मान्यता असताना, तिथे इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतचे वर्ग अनधिकृतरीत्या चालवले जात होते. तसेच परळ-ताडदेव भागातील गोल्डन स्पायरल हायस्कूलमध्ये केवळ इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या वर्गांना मान्यता असताना, तिथे इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंतचे वर्ग बेकायदेशीरपणे सुरू ठेवण्यात आले होते.

दरम्यान, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करण्यापूर्वी संबंधित शाळा अधिकृत आहे की नाही, याची खात्री शिक्षण विभागाच्या अधिकृत पोर्टलवरून करून घ्यावी, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

पुण्यात सायबर गुन्हेगारांचा पर्दाफाश

ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली दररोज ४०० जणांची लूट... कॉल सेंटरवर धाड!

■पुणे। प्रतिनिधी,

पुणे शहरात ऑनलाईन गेमिंगच्या बहाण्याने सामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री लावणारे एक मोठे रॅकेट पोलिसांनी उद्ध्वस्त केले आहे. हडपसर, फुरसुंगी आणि भेकराईनगर या परिसरात अत्यंत शिताफीने हे कॉल सेंटर चालवले जात होते. 'ऑनलाईन गेम खेळा आणि पैसे कमवा' असे आमिष दाखवून हे टोळी भोल्या-भाबड्या नागरिकांना आपल्या जाळ्यात ओढत होती. या टोळीने दररोज तब्बल ३०० ते ४०० जणांना लुटले असून, त्यांच्याकडून लाखो रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक बाब तपासात समोर आली आहे.

फसवे आमिष आणि लुटण्याची कार्यपद्धती

या कॉल सेंटरची कार्यपद्धती अत्यंत गुंतागुंतीची होती. सुरुवातीला युजर्सचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांना काही छोटे गेम्स खेळायला लावून अल्प रक्कम जिंकवून दिली जात असे. एकदा का व्यक्ती गेमच्या नादाला लागला की, त्याला मोठ्या रकमेचे आमिष दाखवले जाई. जेव्हा संबंधित व्यक्ती गेम हरत असे, तेव्हा कॉल सेंटरमधील कर्मचारी त्याला पुन्हा पैसे जिंकण्याची संधी



असल्याचे सांगून अधिक पैसे भरण्यास भाग पाडत. एकदा व्यक्ती जाळ्यात अडकली की, त्यांच्याकडून पैसे ट्रान्सफर करून घेत, त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीत ढकलले जात असे.

मुख्य सूत्रधार दुबईत

या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार सध्या दुबईत बसून या रॅकेटचे संचालन करत असल्याची माहिती समोर आली आहे. स्थानिक पातळीवर संतोष दत्ता वेंजणेकर आणि विनायक ऊर्फ दीपक मनोहर इक्के हे दोघे या व्यवहारांवर लक्ष ठेवून होते. पोलिसांनी या दोघांनाही अटक केली असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, वेंजणेकरने आपल्याकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची घेतली आणि त्यांच्या नावाने सिम कार्ड्स व बनावट बँक खाती उघडून काळा पैसा फिरवण्याचे मोठे षड्यंत्र रचले होते.

छापामारीत जप्त केला तांत्रिक मुद्देमाल

मुंढवा पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सायबर सेल, हडपसर आणि मुंढवा पोलिसांनी संयुक्त मोहीम राबवून या कॉल सेंटरवर छापा टाकला. या कारवाईत पोलिसांच्या हाती मोठे घबाड लागले आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून ॲटो डायलर मशीन, अनेक सिम कार्ड्स, बनावट बँक पासबुक, चेक बुक, कंपनीचे बनावट शिक्के, लॅपटॉप आणि हार्ड डिस्क यांसारखा तांत्रिक मुद्देमाल जप्त केला आहे.

तपासाची चक्रे फिरली; मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू

सध्या मुंढवा पोलीस ठाण्यात या टोळीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. दुबईत बसलेल्या मुख्य सूत्रधारासह त्याच्या इतर सहकाऱ्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. या टोळीने आतापर्यंत नेमकी किती कोटींची फसवणूक केली आहे आणि यात आणखी कोणाचे हात आहेत का, याचा खुलासा लवकरच तपासातून होईल. दरम्यान, ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली सुरू असलेल्या या सायबर फसवणुकीमुळे पुण्यात खळबळ उडाली आहे.

वैद्यकीय उपचाराचा बहाणा

मित्राच्या 7 वर्षीय मुलीला हॉटेलच्या खोलीत...

■मुंबई । प्रतिनिधी,

वैद्यकीय उपचाराच्या बहाण्याने तरुणाने मित्राच्याच मुलीला हॉटेलवर नेत लैंगिक अत्याचार केले. पीडित मुलीचं वय वर्षे 7 होते. आरोपीला पोलिसांनी जेव्हा घेरलं तेव्हा मुलीला तिच्या घरात सोडून पळ काढला. पोलिसांनी शोध घेताना त्याचा पाठलाग केला होता. आरोपीने नंतर पोलिसांवर गोळीबार केला. गोळीबारानंतर प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी देखील गोळीबार केला, ज्यात त्याच्या पायाला गोळी लागली, संबंधित प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली. हा धक्कादायक प्रकार उत्तर प्रदेशातील झाशीमध्ये घडला.

हे प्रकरण गोरखपूरच्या गोला बाजारामधील हरपूर गावातील रहिवासी असलेल्या संजय मिश्रा सध्या टिळक नगरमधील लाकून गिरणीजवळच्या मंदिर रस्त्यावरील एका भाडेतत्त्वाच्या घरात राहत होता. तो एका कंपनीत काम करतो आणि त्याच्यासोबत आणखी एक कर्मचारी राहतो.

मित्रानेच मित्राच्या 7 वर्षाच्या मुलीवर नको तेच...

दोघेही एकमेकांचे अगदी घनिष्ठ मित्र बनले होते आणि एकमेकांच्या घरी जाऊ लागले होते. संजयच्या मित्राच्या सात वर्षीय मुलीला डोळ्यांचा त्रास होऊ लागला. तेव्हा संजय मिश्राने त्याला सांगितलं की, चित्रकूटमध्ये उपचारासाठी उत्तम डॉक्टर आहे. तो स्वतः तिकडे जाणार होता आणि मुलीवर उपचार करून घेणार होता. त्याच्यावर विश्वास ठेवत मित्राने आपल्या मुलीला त्याच्यासोबत पाठवले.

संजय आणि पीडित मुलगी ज्या ऑटो रिक्षातून प्रवास करत होती, त्याच रिक्षातून एक महिला देखील प्रवास करत होती. काहीतरी विचित्र सुरू असल्याचा तिला संशय बळावल्याने तिने जेल स्क्वेअरला याबाबतची माहिती दिली. या माहितीनंतर, नवाबाद पोलिसांनी कारवाई करत ऑटो रिक्षा चालकाला तातडीने ताब्यात घेतले.

रिक्षा चालकाने तरुण आणि पीडित मुलगी जिथे बसली होती याची माहिती दिली. पोलीस मुलीच्या घरी पोहोचले असता, कुटुंबीयांशी संवाद साधला. कुटुंबीयांनी सांगितलं की, त्यांचा मित्र संजय मिश्रा मुलीला उपचारासाठी घेऊन गेला होता.

दरम्यान जेव्हा आरोपीने पोलिसांशी संवाद साधला असता, त्यांनी सांगितलं की, ग्वाल्हेरला पोहोचले, परंतु जेव्हा लोकेशन शोधले असता, तो झाशीमधील एलिट चौकाजवळ आढळून आला होता. पोलीस आणि कुटुंबीयांनी निष्पाप मुलीला तात्काळपणे घरी पाठण्यास सांगितले. यावर आरोपी मुलीला घराजवळ सोडून पळून गेला होता.

आरोपीवर लैंगिक अत्याचाराचा गुन्हा

संबंधित प्रकरणाची माहिती पीडितेनं कुटुंबीयांना दिली. तेव्हा नवाबाद पोलिसांनी आरोपीवर लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला. अशातच आरोपीला घेऊन त्याच्याकडे असलेले पिस्तूर, काडतुसे आणि एक मोबाईल फोन देखील जप्त केला.

नशेचं औषध पाजलं अन् 7 वीच्या मुलीवर पाशवी अत्याचार, 2 सख्ख्या भावांचा क्रूर प्रकार... घटनेनंतर खंडणीची मागणी

■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,

छत्रपती संभाजीनगर शहरातून माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन सख्ख्या भावांनी मिळून सातवीत शिकणाऱ्या एका निष्पाप चिमुरडीला नशेचे औषध पाजले आणि तिच्यावर सामूहिक बलात्कार केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. एवढ्यावरच न थांबता या नराधमांनी पीडितेचे नग्न फोटो आणि व्हिडिओ काढून तिच्या नातेवाईकांना व्हॉट्सॲपवर पाठवले आणि ते व्हायरल करण्याची धमकी देत लाखो रुपयांची खंडणी मागितली.

याप्रकरणी उस्मानपुरा पोलीस ठाण्यात "पोक्सो", सामूहिक बलात्कार आणि खंडणीचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी दोन्ही नराधम भावांना बेड्या ठोकल्या आहेत.

कृष्णा सोळुंके आणि किशोर सोळुंके अशी अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपी भावांची नावे आहेत. पीडित अल्पवयीन मुलगी आणि आरोपींची आधीपासून ओळख होती. याच ओळखीचा गैरफायदा घेत आरोपींनी तिला एका रूमवर नेले. तिथे तिला शीतपेयातून किंवा अन्नातून नशेचे औषध पाजले. मुलगी बेशुद्ध झाल्यानंतर या दोन्ही नराधम भावांनी तिच्यावर पाशवी अत्याचार केला. अत्याचार करताना या नराधमांनी चिमुरडीचे मोबाईलमध्ये नग्न फोटो आणि व्हिडिओ शूट केले. त्यानंतर हे व्हिडिओ मुलीच्या आत्याच्या मोबाईलवर पाठवून दिले. "जर आम्हाला पैसे दिले नाहीत, तर हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून तुमच्या कुटुंबाची बदनामी करू," अशी धमकी देत त्यांनी खंडणी मागण्यास सुरुवात केली. या प्रकारामुळे पीडितेचे कुटुंब पुरते हादरून गेले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी घटनेचं गांभीर्य लक्षात घेता आरोपींचा माग काढला आणि टीव्ही सेंटर भागातील एका बारमधून या दोन्ही आरोपींना मद्यधुंद अवस्थेत रंगेहात ताब्यात घेतले. उस्मानपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घटना घडल्याने जवाहरनगर पोलिसांनी दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी ताब्यात घेतलं आहे.

हा सर्व गुन्हा उस्मानपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्यामुळे जवाहरनगर पोलिसांनी दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी उस्मानपुरा पोलिसांच्या स्वाधीन केले. उस्मानपुरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संग्राम ताठे यांनी गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले आहे. या गंभीर प्रकरणात पोलीस आता पुढील कायदेशीर तपास करत आहेत. पोलीस ठाण्यात 'पोक्सो', सामूहिक बलात्कार आणि खंडणीचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी दोन्ही नराधम भावांना बेड्या ठोकल्या आहेत.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com